## मुख्यमंत्री अधिकारी इन ॲक्शन; तीन आयपीएसचे निलंबन



**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर सुवेंदू अधिकारी आता ॲक्शन मोडमध्ये आले आहेत. सुवेंदू अधिकारी यांनी आरजी कर डॉक्टर अत्याचार आणि हत्येप्रकरणी तीन आयपीएस अधिकाऱ्यांना निलंबित केले आहे. यामध्ये एका पोलीस आयुक्तांचादेखील समावेश आहे. मुख्यमंत्र्यांनी आपल्या पदार्पणातच तीन आयपीएस अधिकाऱ्यांना निलंबित करण्याचा धाडसा निर्णय घेतल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी कोलकाताचे माजी पोलीस आयुक्त विनीत गोयल, माजी पोलीस उपायुक्त (नॉर्थ) अभिषेक गुप्ता आणि पोलीस उपायुक्त (सेंट्रल) इंदिरा मुखर्जी यांना निलंबित केले आहे. मुख्यमंत्र्यांनी या तीनही वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या विरोधात विभागीय कारवाईचे आदेशदेखील दिले आहेत.


रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २९७
www.ramprahar.com

◆ शनिवार, १६ मे २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


### अंतरंग


महाड, पोलादपूरमध्येही भाजपला यश मिळणार/२

लोकसहभागातून आरोग्य समृद्धीकडे वाटचाल/५

मुंबई इंडियन्सचा पंजाबवर विजय!/८


# राज्यातील प्रत्येक बेघराला पक्के घर देणार

## साताऱ्यातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मोठी घोषणा

## प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत पाच लाख घरांचे लोकार्पण

**सातारा : प्रतिनिधी**

महाराष्ट्राला एका वर्षात ३० लाख घरांचे उद्दिष्ट मिळाले असून हा देशातील आतापर्यंतचा उच्चांक आहे. घरांसाठी आज आपल्याला ९ हजार कोटी मिळाले आहेत. ३० लाख घरांच्या उद्दिष्टाच्या तुलनेत आपण अत्यंत गतीने काम करीत पाच लाख बेघर लोकांना घरांच्या चाव्या सुपूर्द करीत आहोत. पुढील वर्षी १५ लाख लोकांना चाव्या सुपूर्द करू. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सर्वांना पक्की घरे या स्वप्नाच्या पूर्तीसाठी अहोरात्र काम करून येत्या पाच वर्षात महाराष्ट्रातील प्रत्येक बेघराला पक्के घर देऊ, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी (दि. १५) दिली.



प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत केंद्र शासनाने महाराष्ट्रासाठी ३० लाख घरे मंजूर केली आहेत. त्यातील पाच लाख घरे पूर्ण झाली असून याचा लोकार्पण सोहळा व महाआवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार वितरण कार्यक्रम सैनिक स्कूलच्या मैदानावर पार पडला. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गत १० वर्षांत महाराष्ट्राला १३ लाख घरे मिळाली, परंतु गेल्या वर्षी केंद्र शासनाने राज्यासाठी ३० लाख घरांचे उद्दिष्ट दिले. यामुळे सव्वा कोटी लोकांना त्यांच्या डोक्यावर पक्के छत मिळणार आहे. २०४७ पर्यंत भारताला विकासित राष्ट्र बनविण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वप्न आहे. प्रत्येकाला हक्काचे घर हा या स्वप्नाचा पाया आहे. प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत घर मिळणाऱ्या प्रत्येक लाभार्थ्याला कायमपणे मोफत वीज देण्यासाठी सौर ऊर्जेसाठी अनुदान देण्यात येत आहे. ज्या लाभार्थ्यांना स्वतःची जागा नाही त्यांना घर बांधण्यासाठी जागा विकत घेण्यासाठी शासन एक लाख रुपयांचे अनुदान देत आहे. अनेक शासकीय जागांवरील आरक्षणे रद्द करून बेघरांना घरासाठी जागा उपलब्ध करून दिल्या आहेत. केंद्र शासन देत असलेल्या अनुदानामध्ये आणखी ५० हजारांची भर राज्य शासनाने घातली आहे. ज्या बेघारांचा यादीमध्ये समावेश नाही त्यांना सामावून घेण्यासाठी पोर्टल पुन्हा उघडले आहे, त्यामुळे त्यांना घर देण्याचा मार्ग मोकळा केला आहे.

# कामोठ्यात रंगणार मिनी महाराष्ट्र केसरी

## सोमवारी कुस्ती स्पर्धेचा थरार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाचे युवा नेते, पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते व विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून दरवर्षीप्रमाणे यंदाही क्रीडाप्रेमींसाठी भारतीय जनता युवा मोर्चा कामोठे आणि रायगड जिल्हा कुस्ती असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि. १८) कामोठेमधील सेक्टर ६ येथील लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालयाच्या भव्य मैदानावर "श्री. परेशशेठ ठाकूर केसरी २०२६" या भव्य जंगी कुस्ती सामन्यांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती शुक्रवारी (दि. १५) येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आली. महाराष्ट्र केसरीप्रमाणे या ठिकाणी भव्यदिव्य स्वरूपात आयोजन असल्याने कामोठेत मिनी महाराष्ट्र केसरी रंगणार आहे आणि त्या अनुषंगाने कुस्तीचा थरार अनुभवायला मिळणार आहे.



पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या पत्रकार परिषदेस भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, महापौर नितीन पाटील, रायगड जिल्हा कुस्ती असोसिएशनचे अध्यक्ष, पनवेल महापालिकेचे नगरसेवक परेश ठाकूर, नगरसेवक दिनेश खानावकर, सुमित झुंझारराव, आयोजक पनवेल महापालिकेचे नगरसेवक हॅप्पी सिंग आणि भाजपचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, कुस्ती प्रशिक्षक रूपेश पावशे, कामोठे युवा मोर्चा अध्यक्ष तेजस जाधव यांच्यासह पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कुस्ती सामन्यांसंदर्भात माहिती देताना नगरसेवक परेश ठाकूर यांनी सांगितले की, या सामन्यांचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते होणार असून यावेळी भाजपचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण, राज्याचे मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकासमंत्री नितेश राणे, भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक, आमदार महेश लांडगे यांची प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थिती असणार असून अन्य प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार मंदाताई म्हात्रे, शिक्षक मतदारसंघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, महापौर नितीन पाटील, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, सभागृहनेते प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, भाजपचे कामोठे मंडल अध्यक्ष विकास घरत, खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, कळंबोली मंडल अध्यक्ष अमर पाटील, पनवेल शहर मंडल अध्यक्ष सुमित झुंझारराव, नवीन पनवेल मंडल अध्यक्ष दशरथ म्हात्रे, उत्तर मंडल अध्यक्ष दिनेश खानावकर, पूर्व मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील, पश्चिम मंडल अध्यक्ष रूपेश धुमाळ यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधींची उपस्थिती असणार आहे.

वाढदिवसानिमित्त कार्यक्रमातून प्रेरणा मिळावी यासाठी सामाजिक उपक्रम राबविले जातात. पनवेलमधील नागरिकांना राष्ट्रीय स्तरावरील कुस्ती सामने प्रत्यक्ष अनुभवता यावेत, पारंपरिक कुस्ती संस्कृती पुढील पिढीपर्यंत पोहचावी व नवोदित खेळाडूंना प्रेरणा मिळावी या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन सातत्याने करण्यात येत आहे.

(पान २..)

## होणार नाही लोकनेता रामशेठ ठाकूरसाहेबांसारखा... विशेष गीताचा प्रकाशन सोहळा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या गौरवशाली जनसेवेचा प्रवास शब्दांत आणि सुरांत गुंफणाऱ्या होणार नाही लोकनेता रामशेठ ठाकूरसाहेबांसारखा... या विशेष गीताचा प्रकाशन सोहळा शुक्रवारी (दि. १५) मोठ्या उत्साहात पार पडला. खुद्द लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते या गीताचे लोकार्पण करण्यात आले. आपल्या वाढदिवसानिमित्त गायक, गीतकार आणि संगीतकार शैलेश चव्हाण यांनी दिलेली ही सांगीतिक भेट अत्यंत मोलाची आणि अविस्मरणीय असल्याचे सांगत लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शैलेश चव्हाण यांच्या कलाकृतीचे भरभरून कौतुक केले.



या गीताचे शीर्षक अतिशय समर्पक असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

(पान २..)

## ना. गडकरी धमकीप्रकरणी दोन्ही आरोपींना पाच वर्षांचा कारावास

**नागपूर :** केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी यांना धमकी देऊन कोट्यवधी रुपयांची खंडणी मागणाऱ्या प्रकरणात नागपूर न्यायालयाने मोठा निर्णय दिला आहे. या प्रकरणातील आरोपी जयेश पुजारी उर्फ शाकीर आणि अफसर पाशा यांना प्रत्येकी पाच वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. तसेच दोघांवर दंडही ठोठावण्यात आला असून दंड न भरल्यास अतिरिक्त कारावास भोगावा लागणार आहे. हे प्रकरण जानेवारी २०२३ मध्ये उघडकीस आले होते. १४ जानेवारी आणि २१ मार्च रोजी नागपूर येथील गडकरी यांच्या जनसंपर्क कार्यालयात धमकीचे फोन करण्यात आले होते. फोन करणाऱ्यांनी सुरुवातीला १०० कोटी रुपयांची खंडणी मागितली होती.

## निवडक

### पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत तीन रुपयांची वाढ

**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील युद्ध आणि त्यानंतर बंद झालेल्या होर्मुझ सामुद्रधुनीमुळे जागतिक पातळीवर कच्च्या तेलाच्या किमती वाढल्या आहेत. त्या पाश्वभूमीवर सार्वजनिक क्षेत्रातील ऑइल मार्केटिंग कंपन्यांनी पेट्रोल-डिझेलच्या किमतीत तीन रुपयांनी वाढ केली आहे. मागील चार वर्षांत पहिल्यांदाच किमतीत वाढ झाली.

### विमान इंधनावरील 'व्हॅट'मध्ये ११ टक्क्यांची कपात

**मुंबई :** महाराष्ट्र सरकारने राज्यातील विमान प्रवाशांना आणि विमान कंपन्यांना मोठा दिलासा दिला आहे. विमानाच्या इंधनावरील (एटीएफ) मूल्यवर्धित कर (व्हॅट) १८ टक्क्यांवरून थेट सात टक्क्यांपर्यंत कमी करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला असून १५ मेपासूनच याची अंमलबजावणी सुरू झाली आहे.

## मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर तीन वाहनांचा भीषण अपघात

### दोघे जागीच ठार, तर दोन जण जखमी

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

शुक्रवारी मध्यरात्री १.३० वाजण्याच्या सुमारास बोरघाटातील खोपोली बायपासजवळ चार वाहनांचे नुकसान झाले होते. ती घटना ताजी असतानाच शुक्रवारी (दि १५) सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर दोन ट्रक आणि कंटेनर यांच्या अपघातात दोन जण ठार आणि दोन जण जखमी झाले. जखमींना कळंबोली येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ठार झालेल्या व जखमींची नावे अद्याप समजू शकली नाहीत.



ट्रकमधील सामान आणि पेंटसदृश्य साहित्य रस्त्यावर विखुरल्याने फक्त एकच लेन सुरू होती. एकूण ३ वाहनांचा अपघात झाला असून ट्रक क्रमांक KA ५६ २१९९ मधील चालक व क्लिनर दोघांचा जागीच मृत्यू झाला आहे. ट्रक क्रमांक RJ १९-GG-४१७५ मधील चालकास गंभीर दुखापत झाली आहे. कंटेनर ट्रक क्रमांक MH ०४-GR-२८७४ मधील चालकही जखमी झाला आहे. तीव्र उतारावर ट्रकचा ब्रेक फेल झाल्याने हा अपघात घडला. कलरचे डबे घेऊन जाणारा ट्रक खोपोली बायपासजवळ ढेकू गावाच्या हद्दीत आला असता हा अपघात घडला.

# खालापूरचे नवीन प्रशासकीय कार्यालय सर्वसामान्यांचे मंदिर

## आमदार महेश बालदी आणि महेंद्र थोरवे यांचे प्रतिपादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खालापूर तालुक्याचे नवीन प्रशासकीय कार्यालय हे सर्वसामान्य नागरिकांचे मंदिर असून, येथे येणाऱ्या प्रत्येकाचे काम प्राधान्यक्रमाने होऊन त्यांना न्याय मिळाला पाहिजे, असे प्रतिपादन आमदार महेश बालदी आणि आमदार महेंद्र थोरवे यांनी केले. २०११ मध्ये मंजूर झालेल्या आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने सुमारे ११ कोटी रुपये खर्चून पूर्ण केलेल्या या नूतन प्रशासकीय इमारतीचा लोकार्पण सोहळा शुक्रवारी (दि. १५) आमदार महेश बालदी आणि आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते व रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत दिमाखात संपन्न झाला.



यावेळी बोलताना आमदार महेश बालदी यांनी आदिवासी बांधव योजनांपासून वंचित राहू नयेत आणि विद्यार्थ्यांना शाळेतच दाखले मिळावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली.

आमदार महेंद्र थोरवे यांनी राज्य सरकारच्या माध्यमातून खालापूर आणि उरण मतदारसंघाचा विकासाचा कायापालट होत असल्याचे सांगून प्रशासकीय यंत्रणेच्या कामाचे कौतुक केले. या सोहळ्यात खंडाळा घाटातील गॅस टँकर दुर्घटनेवेळी मदत करणाऱ्या हेल्प फाऊंडेशन खोपोली, पोलीस आणि सामाजिक संस्थांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच विविध दाखले, शैक्षणिक दाखले, लाभार्थी मंजूर योजनांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, मंडळ अध्यक्ष प्रवीण मोरे, जिल्हा परिषद सदस्य नेहा पारंगे, संतोष बैलमारे, अधीक्षक अभियंता सुषमा गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल, माजी सभापती तथा सदस्य कमल भस्मा, विनोद भोईर, निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड, विकास पवार यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# मुंबई-अलिबाग जलवाहतुकीला पावसाळी ब्रेक

## पर्यटन व्यवसाय हंगामाला फटका बसण्याची शक्यता

**अलिबाग : प्रतिनिधी**

मुंबई ते अलिबाग प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांसाठी आणि पर्यटकांसाठी महत्त्वाच्या अशा मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया ते रायगड जिल्ह्यातील मांडवादरम्यान धावणाऱ्या प्रवासी फेरी सेवेला येत्या २५ मेपासून पावसाळी ब्रेक लागणार आहे. महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने सुरक्षेच्या कारणास्तव ही सेवा ३१ ऑगस्टपर्यंत बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे मुंबई-मांडवा जलवाहतुकीचा यंदाचा हंगाम संपुष्टात येणार असून २५ मे हा शेवटचा प्रवासी दिवस असणार आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही पावसाळ्यात समुद्रातील मोठ्या लाटा, वादळी वारे आणि खराब हवामान लक्षात घेऊन प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. पावसाळ्यात अरबी समुद्र खवळत असल्याने प्रवासी बोटींच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होऊ शकतो. संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून प्रवासी जलवाहतूक बंद करण्यात येत असल्याचे महाराष्ट्र सागरी मंडळाने स्पष्ट केले आहे.



### काही प्रवाशांना दिलासा

पीएनपी, मालदार, अजंठा तसेच इतर खासगी कंपन्यांच्या गेट वे-मांडवा मार्गावरील फेरी बोटी २६ मे ते ३१ ऑगस्टदरम्यान बंद राहणार आहेत, मात्र मांडवा ते भाऊचा धक्कादरम्यानची रो-रो सेवा सुरू राहणार असल्याने वाहनधारक आणि काही प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. तसेच दिघी-आगरदांडा मार्गावरील जेट्टी वाहतूकही सुरूच राहणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. मुंबईकरांसाठी अलिबाग हे अत्यंत लोकप्रिय पर्यटनस्थळ मानले जाते. कमी वेळात, कमी खर्चात आणि समुद्रमार्गाच्या रोमांचक अनुभवामुळे गेट वे ते मांडवा फेरी सेवेला वर्षभर मोठी मागणी असते. विशेषतः शनिवार-रविवार आणि सुट्ट्यांच्या काळात हजारो पर्यटक या मार्गाने अलिबाग, नागाव, काशिद, मुरूड यांसारख्या पर्यटनस्थळांकडे रवाना होत असतात, मात्र आता पुढील तीन महिने ही सेवा बंद राहणार असल्याने पर्यटकांना रस्तेमार्गाचा आधार घ्यावा लागणार आहे.

### नियोजनावर परिणाम

फेरी बंदीमुळे अलिबागचा प्रवास तुलनेने अधिक वेळखाऊ आणि खर्चिक होण्याची शक्यता आहे. मुंबईहून रस्तेमार्गाने अलिबाग गाठण्यासाठी अधिक वेळ लागत असल्याने अनेक पर्यटकांच्या नियोजनावर परिणाम होऊ शकतो. याचबरोबर रायगड जिल्ह्यातील पर्यटन व्यवसायालाही या बंदीचा फटका बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. स्थानिक हॉटेल व्यावसायिक, रिसॉर्ट चालक, दुकानदार आणि पर्यटनाशी संबंधित व्यवसाय मोठ्या प्रमाणावर या जलवाहतुकीवर अवलंबून असतात.

## डॉ. आनंद नाडकर्णी यांचे निधन

**मुंबई : प्रतिनिधी**

मानसिक आरोग्याच्या क्षेत्रात चार दशकांहून अधिक काळ भरीव काम करणारे प्रख्यात मनोविकारतज्ज्ञ, विचारवंत, लेखक आणि सामाजिक कार्यकर्ते डॉ. आनंद नाडकर्णी यांचे शुक्रवारी (दि.१५) सकाळी निधन झाले.



वैद्यकीय उपचार, व्यसनमुक्ती, साहित्य, कला आणि मानसिक आरोग्य जनजागृती या अनेक क्षेत्रांत त्यांनी खोल आणि दीर्घकालीन ठसा उमटवला. मुक्तांगण आणि Institute for Psychological Health (IPH) सारख्या संस्थांच्या माध्यमातून त्यांनी मानसिक आरोग्यसेवेला सामाजिक आंदोलनाचे स्वरूप दिले.

डॉ. आनंद नाडकर्णी यांचा जन्म २२ डिसेंबर १९५८ रोजी झाला होता. ते प्रख्यात मनोविकारतज्ज्ञ, विचारवंत, लेखक, नाटककार, कवी, संगीतकार, चित्रकार आणि सामाजिक कार्यकर्ते होते. मानसिक आरोग्य, साहित्य, कला आणि सामाजिक जाणीव या क्षेत्रांत त्यांनी केलेले कार्य दीर्घकाळ स्मरणात राहणारे ठरले आहे.

# भारताचा यूएईशी मोठा करार

## पेट्रोल, डिझेल, एलपीजी तुटवडा रोखण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे ठोस पाऊल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पश्चिम आशियातील वाढता तणाव आणि इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारताने आपली ऊर्जा सुरक्षा सुरक्षित करण्यासाठी मोठी पावले उचलली आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी (दि. १५) संयुक्त अरब अमिरातीचा धावता दौरा करून इंधन पुरवठ्याबाबत महत्त्वाचे करार केले. यावेळी त्यांनी यूएईवर झालेल्या हल्ल्याचा निषेध व्यक्त केला. संयुक्त अरब अमिरातीचे अध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायद अल नाहयान यांच्याबरोबर झालेल्या चर्चेत पंतप्रधान मोदी म्हणाले की, आम्ही युएईवर झालेल्या हल्ल्याचा निषेध करतो.



ब्रिक्स संघटनेचे भागीदार असलेल्या भारत आणि यूएईने यावेळी सामरिक संरक्षण सहकार्य, पेट्रोलियम साठे आणि एलपीजी गॅसचा पुरवठा याबाबत करार केले आहेत. पंतप्रधान मोदी शुक्रवारपासून चार देशांच्या युरोप दौऱ्यावर निघाले. त्यापूर्वी ते संयुक्त अरब अमिरातीमध्ये काही काळ थांबले. तीन तासांच्या या भेटीत पंतप्रधान मोदी यांनी भारत व यूएईमध्ये सामरिक संरक्षण भागीदारी आराखड्यावर स्वाक्षरी केली. तसेच पेट्रोलियम साठे, एलपीजी, गुजरातच्या वाडिणार येथे जहाज दुरुस्ती क्लस्टर स्थापन करण्यासाठी करार केला. इंडियन इन्फ्रास्ट्रक्चर, आरबीएल बँक, सन्मान कॅपिटलमध्ये पाच अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या गुंतवणुकीचीही घोषणा यावेळी केली.

युद्धाच्या कठीण काळात धैर्य आणि शहाणपण दाखवल्याबद्दल पंतप्रधान मोदींनी यूएईच्या अध्यक्षांची स्तुती केली. तसेच यूएईमधील भारतीय समुदायाची कुटुंबातील सदस्यांप्रमाणे काळजी घेतल्याबद्दल त्यांचे आभार मानले. इराण युद्धाचे परिणाम संपूर्ण जगावर जाणवत आहेत.

# स्वच्छतेसाठी महापौर आपल्या प्रभागात मोहिमेंतर्गत पनवेलमध्ये विशेष स्वच्छता मोहीम




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल मधील प्रभाग १९ मध्ये आज दिनांक १५ मे रोजी महापौर नितीन पाटील व महापालिका सदस्य राजू सोनी, सुमित झुंजारराव,नगरसेविका दर्शना भोईर, रुचिता लोंढे, डॉ. अस्मिता घरत, पनवेल महानगरपालिकेचे उपायुक्त डॉ.वैभव विधाते, विभाग प्रमुख अनिल कोकरे, मुख्य आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे,यांच्या प्रमुख उपस्थितीत नालेसफाईस सुरूवात करण्यात आले.

तसेच “स्वच्छतेसाठी महापौर आपल्या प्रभागात” या उपक्रमांतर्गत प्रभाग क्रमांक १९ मध्ये विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यावेळी दुर्लक्षित ठिकाणांची स्वच्छता करण्याच्या सूचना महापौर नितीन पाटील यांनी दिल्या. त्यानूसार मोहिमेदरम्यान विविध ठिकाणी कचरा वेचक वाहन व घंटागाडीच्या माध्यमातून परिसर स्वच्छता अभियान प्रभावीपणे राबविण्यात आले. यावेळी औषध फवारणी विभागाचे पर्यवेक्षक व कर्मचारी देखील उपस्थित होते. आवश्यक ठिकाणी त्यांनी फॉगिंग, स्प्रेईंग केले. तसेच स्वच्छता व आरोग्यविषयक उपाययोजना राबविल्या. या स्वच्छता मोहीमेध्ये मोठ्या संख्येने स्वच्छता निरीक्षक, पर्यवेक्षक तसेच स्वच्छता दूत उपस्थित होते.

या मोहिमेअंतर्गत नालेसफाई, डास प्रतिबंधक फॉगिंग व औषध फवारणी, कचरा संकलन आणि परिसर स्वच्छता यावर विशेष भर देण्यात आला. नागरिकांनीही परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी महानगरपालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन केले.

## ट्रॅव्हल बस आणि थार गाडीचा अपघात

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

ट्रॅव्हल बस आणि थार गाडीचा अपघात झाल्याने बसमधील चालक आणि प्रवासी जखमी झाले. या अपघाता प्रकरणी थार गाडीवरील चालकाविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात १४ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

फिर्यादी अजय गणपत वाडकर हे जोगेश्वरी, मुंबई येथे राहत असून ट्रॅव्हल्स बस क्रमांक एम एच ०४ एम एच ५९२० हे प्रवासी घेऊन महाबळेश्वर ते मुंबई असे येत होते .एच एस पी ट्रॅफिक पोलीस चौकी, अजिवली पुणे मुंबई एक्सप्रेस हायवे येथे बस आली असता थार गाडी क्रमांक एम एच १२ वाय एन ००४५ वरील चालकाने पनवेल एक्झिट नो एन्ट्री मार्गे रस्त्याच्या विरुद्ध दिशेने गाडी चालवली. आणि धोकादायक स्थितीत एक्सप्रेस हायवेवर वळण घेऊन मुंबई दिशेकडे जात असताना अचानकपणे एक्सप्रेस वरून जाणाऱ्या ट्रॅव्हल्स बसच्या समोर आला आणि ट्रॅव्हल बस आणि थार गाडीचा अपघात झाला. या अपघातात फिर्यादी अजय वाडकर आणि काही प्रवाशांना किरकोळ दुखापती झाल्या. या अपघातात दोन्ही गाड्यांचे नुकसान झाले आहे. याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस अधिक तपास करत आहेत.

## मोटरसायकल अपघातात एकाचा मृत्यू

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

ॲक्टिवा मोटरसायकलचा अपघात होऊन ५८ वर्षीय इसम गाडीसह दगडावर जाऊन आदळल्याने त्यांचा मृत्यू झाला. या अपघाताप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात १४ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

८ मे रोजी योगेश परशुराम पावशे (३६ तुर्भे, तळोजा) त्यांच्या ताब्यातील एक्टिवावर त्याचे वडील परशुराम शनिवार पावशे (५८) यांच्यासह बेलवली येथून नेरे येथे जात होते. यावेळी एक्टिवा मोटरसायकल भरधाव वेगाने चालवून मोटरसायकल आंबिवली–नेरे रोडवर स्मशानभूमीच्या जवळ आला असता रस्ता सोडून रस्त्याच्या बाजूला असलेल्या दगडावर जाऊन आदळली.

# पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण वर्गात आमदार प्रशांत ठाकूर यांचे कार्यकर्त्यांना मार्गदर्शन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियानांतर्गत आयोजित जिल्हा प्रशिक्षण वर्गाचा दुसरा दिवस उत्साहात पार पडला. या प्रशिक्षणादरम्यान आठव्या सत्रात भाजपचे प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित कार्यकर्त्यांनाआणि पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी त्यांनी आपल्या सरकारची गरीब कल्याण योजना आणि त्यांच्या अंमलबजावणीमध्ये संघटनेची भूमिका या महत्त्वपूर्ण विषयावर सविस्तर भाष्य केले.

सरकारी योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटका पर्यंत पोहोचवण्यासाठी संघटनेचे जाळे आणि कार्यकर्त्यांचे योगदान किती महत्त्वाचे आहे, यावर त्यांनी यावेळी विशेष भर दिला. या महाअभियानाद्वारे कार्यकर्त्यांना वैचारिक आणि तांत्रिकदृष्टया सक्षम करण्याचे काम होत असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.



**पनवेल : भाजप उत्तर मंडल सरचिटणिस अंकुश पाटील यांना भाजप राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. यावेळी उपसभापती भूपेंद्र पाटील, महेंद्र गोजे, के. सी. पाटील, प्रतीक चौधरी, सागर पाटील, रामदास केत्रे उपस्थित होते.**



**पनवेल : पनवेलजवळील पारगाव कोल्ही गावात अजय नाईक यांचा विवाह प्रचिती हिच्यासोबत झाला. या विवाह सोहळ्याला रोजगार हमी व फलोत्पादन आणि खार जमिनी विकास मंत्री नामदार भरतशेठ गोगावले यांनी उपस्थित राहून वधू–वरांना शुभाशीर्वाद दिले. या प्रसंगी अहिल्या बाळाराम नाईक सरपंच तथा सदस्य रायगड जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती दिशा अलिबाग रायगड, बाळाराम नाईक शिवसेना उरण संपर्कप्रमुख विधानसभा क्षेत्र उरण पंकज राम नाईक,अजय राम नाईक, पद्माकर कृष्णा नाईक, अनिल कृष्ण नाईक, लक्ष्मण केशव नाईक,विशाल श्याम नाईक, मुकेश श्याम नाईक, आकाश बाळाराम नाईक,स्वप्निल मोरे शिवसेना संघटक उरण, प्रकाश भोईर,कैलास भोईर, रोशन पाटील, निलेश गायकवाड उपसरपंच ओवळे हे उपस्थित होते.**

# आरसा हा कलावंतांचा पहिला गुरू -ज्येष्ठ रंगकर्मी रवींद्र देवधर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अभिनेता असो वा अभिनेत्री कोणत्याही कलावंताचा पहिला गुरू म्हणजे आरसा, दर्पण. तो कधीच खोटे बोलत नाही,चुकीचे सांगत नाही. असे प्रतिपादन जेष्ठ रंगकर्मी रवींद्र देवधर यांनी सांगितले.

पनवेल महानगरपालिका व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा पनवेल यांच्या संयुक्त विद्यमानेआयोजित नऊ दिवसांच्या अभिनय प्रशिक्षण शिबिरांतर्गत दिनांक १४ मे रोजी शिबिरार्थींना मार्गदर्शन करताना तेबोलतहोते. खारघर कळंबोली व पनवेल अशा तीनही ठिकाणी त्यांनी शिबिरार्थींना मार्गदर्शन केले.

पुढे ते म्हणाले, नाटकामधून संवाद होतो, नाटकातील संवाद हे उत्तम अभिनयासाठीचे सक्षम माध्यम आहे. कलावंतानी संवाद दमदार व्हावेत यासाठी रियाज करावा , त्यासाठी प्रामुख्याने कवितेचे वाचन,पठन, मनन करावे असे सांगितले. यावेळी देवधर यांनी त्यांच्या ‘मी भारतीय’ या नाटकातील एक भावपुर्ण प्रसंग करून दाखविला. तसेच प्रशिक्षणार्थीच्या प्रश्नांची समर्पक उत्तरे दिली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर यांनी केले.यावेळी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे कार्यवाह शामनाथ पुंडे, कविता ठाकूर, गणेश जगताप, स्मिता गांधी उपस्थित होते.



**पनवेल : पनवेल महानगरपालिका अधिकारी, इंजिनिअर, महानगर गॅस अधिकारी , नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ तसेच माजी सभागृह नेते नगरसेवक परेश ठाकूर यांच्या सहाय्यकांसोबत गुरुवार रोजी महानगर गॅस कामांच्या संदर्भात प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. यावेळी महानगर गॅस लाईन टाकण्यासाठी खोदण्यात आलेल्या खड्ड्यांची तसेच सुरू असलेल्या कामांची सविस्तर माहिती घेण्यात आली. पूर्ण झालेल्या महानगर गॅस कामांनंतर संबंधित रस्त्यांची दुरुस्ती व पुनर्बांधणीची कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावीत याबाबत अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली.**

# चिरनेर येथे फार्मर कप स्पर्धेविषयी शेतकऱ्यांना अमूल्य मार्गदर्शन

**उरण : प्रतिनिधी**



पाणी फाउंडेशनतर्फे तालुका स्तरीय खरीप हंगाम नियोजन व पूर्व तयारीचा आराखडा आणि अनुभवांची देवाणघेवाण तसेच फार्मर कप स्पर्धेविषयी गटातील शेतकऱ्यांना विशेष मार्गदर्शन करण्यासंदर्भात नुकतीच चिरनेर येथील निकीदीप या नर्सरीमध्ये पानी फाउंडेशनचे आशिष लाड यांच्या प्रमुख उपस्थितीत चिरनेर येथील सुजलाम शेतकरी गटाची विशेष बैठक पार पडली. प्रारंभी कृषी सहाय्यक अधिकारी सुषमा गायकवाड यांनी प्रास्ताविकेतून खरीप हंगामाविषयी तसेच फार्मर कप स्पर्धेविषयी व शेतकरी गट बांधणीविषयी आपल्या मार्गदर्शनातून विशेष आढावा घेतला. त्यानंतर त्यांनी चिरनेर गावातील शेतकऱ्यांची गट बांधणी करून घेतली.

पानी फाउंडेशनचे आशिष लाड यांनी जमीनीची सुपीकता, आणि भात लागवड ही पारंपरिक पद्धतीपेक्षा वेगळी असावी. यात भाताची रोपे ठराविक अंतरावर लावली जावीत. दोन ओळींचे अंतर १५/२० असे असावे. यात दोन रोपातले अंतर १५ सेंटीमीटर व २५ सेंटीमीटर असावे. असे स्पष्ट केले. भात रोपांना पुरेसा सूर्यप्रकाश मिळायला पाहिजे. तसेच हिरवळीच्या खतांचा वापर करावा. यातून पुरेसे अन्नद्रव्य मिळते. त्यामुळे उत्पादनात चांगली वाढ होते. कामगंध सापळ्यांचा वापर, प्रकाश सापळ्यांचा वापर, चिकट सापळे, पिवळे चिकट सापळे, निळे चिकट सापळे तसेच प्रमाणित सुधारित संकरित हायब्रीड भात बियांची निवड करावी. पेरणीची तारीख व पीक काढणीपर्यंत आराखडा असावा.

जैविक व कीटकनाशकांचा वापर, मातीचे नमुने काढणे, विमा काढणे, रोपवाटिका व्यवस्थापन तसेच भात लागवड पद्धतीविषयी माहिती दिली. तसेच यावेळी गटातील शेतकऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देखील त्यांनी दिली. कृषी सहाय्यक अधिकारी आदिका पानसरे यांनी जैविक तसेच बिजप्रक्रिया व त्याचे फायदे याची माहिती दिली. शेतकरी तथा आंबाबागायतदार बळीराम म्हात्रे यांनी बिजप्रक्रिया ते भात लागवड व तंत्रज्ञान नियोजन याबाबत कृषी विभागाला सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. शेवटी उपकृषी अधिकारी ए डी बुरकूल यांनी बियाणे खरेदी करताना घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन करून, शेवटी सर्वांचे आभार व्यक्त केले. यावेळी शेतकरी दामोदर केणी, बळीराम म्हात्रे विजय म्हात्रे, कृष्णा म्हात्रे, कल्पेश म्हात्रे, मंगेश ठाकूर, दत्तात्रेय म्हात्रे यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

# विकासकामांच्या खोदकामात वीजवाहिन्या तुटण्याच्या त्रासातून पनवेलकरांची होणार सुटका

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल शहरातील टिळक रोड, महात्मा फुले रोड, एचओसी कॉलनीच्या मागील रोड, गडकरी मार्ग आणि महात्मा गांधी मार्ग या अत्यंत महत्त्वाच्या व वर्दळीच्या भागातील नागरिक गेल्या अनेक दिवसांपासून वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे हैराण झाले आहेत. विकासकामे आणि गॅस पाईपलाईनच्या खोदकामात भूमिगत वीजवाहिन्या तुटण्याचे प्रमाण वाढल्याने हा प्रश्न गंभीर बनला होता. यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी शिवसेनेचे नगरसेवक तथा पनवेल महानगरप्रमुख ॲड. प्रथमेश चंद्रशेखर सोमण यांनी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून एका विशेष समन्वय बैठकीची मागणी केली होती. या मागणीची दखल घेत आयुक्त श्री. मंगेश चितळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत आता 'टास्क फोर्स' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शहरात सध्या काँक्रिटीकरणाचे



आणि महानगर गॅसच्या जोडणीचे काम जोमाने सुरू आहे. मात्र, महापालिका आणि महावितरण यांच्यात समन्वयाचा अभाव असल्याने कंत्राटदारांकडून खोदकाम करताना वीजवाहिन्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत होते. विशेषतः जुन्या पनवेलमधील मुख्य रस्ते आणि वस्त्यांमध्ये हा त्रास अधिक जाणवत होता. नियमानुसार, रस्त्याच्या कामात आडव्या येणाऱ्या वाहिन्या कंत्राटदाराने स्वखर्चाने अंडरग्राउंड करणे आवश्यक असताना, प्रशासकीय ताळमेळ नसल्याने या कामात दिरंगाई होत होती. ही बाब ॲड. प्रथमेश सोमण यांनी पुराव्यांसह प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली.

सोमण यांच्या सूचनेनुसार व मागणीनुसार आयोजित या बैठकीत असा निर्णय झाला की, उद्यापासून कोणत्याही रस्त्याचे काम सुरू करण्यापूर्वी महापालिका, महावितरण आणि संबंधित कंत्राटदार यांची 'टास्क फोर्स' प्रत्यक्ष जागेवर जाऊन समन्वय साधेल. यामुळे खोदकामात वाहिन्या तुटण्याचे प्रकार थांबणार असून नागरिकांना विनाकारण अंधारात राहावे लागणार नाही. या महत्त्वपूर्ण बैठकीला अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, शहर अभियंता संजय कटेकर, महावितरणचे अधीक्षक अभियंता श्री. माने, शहर अभियंता श्री. सातपुते व श्री. देशमुख उपस्थित होते. तसेच शिवसेनेच्या वतीने पनवेल समन्वयक राहुल गोगटे, उपमहानगर प्रमुख महेश सावंत, शहरप्रमुख प्रसाद सोनावणे, शहर संघटक अभिजीत साखरे, उपशहरप्रमुख अर्जुन परदेशी, तळोजा विभाग प्रमुख प्रकाश म्हात्रे, तालुका उपसंघटक नरेश नरसिंगे, मायनॉरिटी सेलचे अराफत पटेल आणि मिलिंद निंबाळकर यांनी बैठकीत सहभाग घेतला.

## उरण महाविद्यालयात जर्मन व जपानी भाषा प्रशिक्षण

**उरण : बातमीदार**

आजच्या स्पर्धात्मक युगात नवनवीन कौशल्य विद्यार्थ्यांना आत्मसात करणे गरजेचे आहे. त्याचा एक भाग म्हणजे परदेशी भाषा अवगत असणे होय. सद्यस्थितीत जर्मनी आणि जपान या दोन देशांमध्ये मनुष्यबळाची तीव्र कमतरता निर्माण झाली आहे त्याचा परिणाम त्यांच्या अर्थव्यवस्थेवर होत आहे म्हणून महाराष्ट्र शासन आणि जर्मनी देशा अंतर्गत करार झाला असून महाराष्ट्रातील दहा हजार लोकांना रोजगाराची संधी यातून मिळणार आहे. तसेच जपान देशासोबत झालेल्या करारा नुसार पाच लाख लोकांना रोजगार संधी मिळणार आहे.मात्र या देशांमध्ये जायचे असेल तर तेथील भाषा अवगत असणे आवश्यक आहे.

याचा विचार करून उरण आणि परिसरातील गरजूंना कोकण ज्ञानपीठ उरण महाविद्यालयात जर्मन व जपानी भाषा प्रशिक्षण वर्ग नवीन शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यात येत आहेत जर्मनीच्या प्रसिद्ध गोथें इन्स्टिट्यूटच्या सहकार्याने तज्ञ शिक्षक हे प्रशिक्षण देणार आहेत.

संपादकीय

# सामूहिक आवाजाची शक्ती!

इंधनबचत आणि ऊर्जाबचत ही देशाची गरज आहे, त्यामध्ये राजकारण करता येणार नाही, हे समाजास समजले, आणि त्याची दखल घेऊन विरोधकांनीही समाजाच्या सुरात सूर मिसळण्याचा समंजसपणा दाखविला, हे योग्य झाले.

**कोणताही विचार किंवा कृती व्यापक समाजहिताच्या दृष्टीने कितीही अयोग्य असली तरी कोणत्याही कारणाने त्याचे समर्थन करणारा व्यक्तिगत आचार कालांतराने समाजाच्या विचारासोबत जुळवून घेतो आणि व्यापक हितालाच अधिक महत्व दिले जाते. असे ज्या समाजात घडते त्या समाजाच्या सामाजिक जाणिवा जिवंत असतात. त्या समाजात व्यक्तिहिताहून समाजहितास महत्व दिले जाते. भारतीय समाजव्यवस्थेचेही तेच वैशिष्ट्य आहे. अगोदर व्यक्तिगत पातळीवर एखाद्या विचार किंवा कृतीच्या विरोधात दंड थोपटले जातात, अशा विरोधाचाही एक सामूहिक आवाज उमटतो, पण सहमतीचा आवाज त्याहूनही मोठा आहे आणि त्यासोबत जावयास हवे असे जेव्हा जाणवते तेव्हा विरोधाचे आवाज मंदावत जातात. ही प्रक्रिया संथपणे होते, पण ती नाकारली जात नाही असे अनेकदा भारतात दिसून आले आहे. व्यापक समाजहिताची सामाजिक भावना हेच त्याचे कारण असते. कोविडकाळातील संकट याच समाजिक भावनेतून सर्वांनी मिळून झेलले आणि परतवून लावले, पाकिस्तानात प्रशिक्षित झालेल्या दहशतवाद्यांनी भारतात केलेल्या विध्वंसक आणि हिंसक कारवायांच्या विरोधातील कारवाईच्या निमित्तानेदेखील हेच दिसून आले. पाकिस्तानातील दहशतवादी तळ उद्ध्वस्त करण्याच्या भारतीय सैन्याच्या कारवाईचे पुरावे मागणारे सूर याच कारणामुळे पुढे मंदावले आणि भारताने केलेल्या कारवायांची गरज व आवश्यकता जगाला पटवून देण्यासाठी याच विरोधी सुरातील काही सूर पुढे सरसावले. सामाजिक भावनांचा हा दबाव आता पुन्हा एकदा दिसून येऊ लागला आहे. अमेरिका–इराण युद्धामुळे देशावर दाटलेल्या संकटाचा सामना करण्यासाठी सरकार सज्ज असले तरी सामूहिकपणे समोर आले पाहिजे ही गरज जेव्हा गडद होऊ लागली, तेव्हा पंतप्रधान मोदी यांनी केलेल्या काटकसर आणि बचतीच्या आवाहनाची खिल्ली उडविणारी सूर देशाच्या कानाकोपऱ्यात उमटले होते. विरोध व्यक्त करणे हा विरोधकांचा अधिकारच असतो, त्यामुळे पंतप्रधानांच्या या आवाहनावर तातडीने सकारात्मक पवित्रा घेऊन लगेच विरोधकांनी त्यानुसार कृती करावयास घ्यावी अशी समाजाचीही अपेक्षा नव्हतीच, आणि पंतप्रधानांच्या या आवाहनास आंधळेपणाने पाठिंबा का द्यावा असा प्रश्न पडलेल्या अनेकांस विरोधकांच्या सुरुवातीच्या पवित्र्यामुळे उत्तरे शोधण्यास मदतही झाली. अखेर, पंतप्रधानांचे ते आवाहन अंतिमतः देशहिताचे आणि जनतेच्या गरजांचे संरक्षण करण्याच्या हेतूनेच झाले आहे, हे समाजास पटले आणि त्यास सकारात्मक प्रतिसादाचे पडसाद उमटू लागले तेव्हा विरोधाचे सूरदेखील मवाळ झाले, हा समाजाच्या सामूहिक समंजसपणाची पावती व पुरावा म्हणावा लागेल. आता अनेक राज्य सरकारे काटकसरीसाठी सरसावली आहेत. महाराष्ट्रात काटकसरीची सरकारी आचारसंहिताच जारी झाली. दिल्ली सरकारमधील मंत्रिमंडळाने आठवड्यातील दोन दिवस 'वर्क फ्रॉम होम' संस्कृती अवलंबिण्याचे ठरविले. कर्मचाऱ्यांनी प्रत्येक सोमवारी मेट्रोप्रवास करून इंधनबचतीचा मार्ग स्वीकारला. सामाजिक प्रतिसादाचा बदलता सकारात्मक आवाज उंचावत गेल्यावर आता विरोधाचे सूरही मावळले आहेत. पंतप्रधानांच्या आवाहनाचा गांभीर्याने विचार करावा असा सूर उमटू लागला आहे. समाजाने सकारात्मकता दाखविली तर विरोधासाठी विरोध करणारे सूर मावळतात हे दिसले. कोणत्याही संकटकाळात दिसणारी ही सामूहिकता या संकटास सामोरे जाण्याचीदेखील शक्ती देईल यात शंका नाही.**

# भग्न दगडांपासून अखंड श्रद्धेपर्यंत : सोमनाथची गाथा

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लवकरच, १३ नोव्हेंबर १९४७ रोजी तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री आणि उपपंतप्रधान सरदार वल्लभभाई पटेल सोमनाथ येथे गेले. समुद्रकिनारी उभे राहून त्यांनी मंदिराच्या भग्नावशेषांकडे गंभीर नजरेने पाहिले आणि एक प्रतिज्ञा केली सोमनाथ मंदिराच्या पुनर्निर्माणाची. तो क्षण म्हणजे भारताच्या सांस्कृतिक पुनर्जागरणाचा पहिला मोठा जागर; आपल्या सभ्यतेच्या स्वाभिमानाच्या सार्वजनिक पुनर्प्राप्तीचा क्षण होता.

आणि आता ११ मे रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सोमनाथ अमृत महोत्सवात उपस्थित राहून मंदिराच्या पुनर्स्थापित तेजात सहभाग घेतला, तेव्हा तीच प्रतिज्ञा पुन्हा नव्याने प्रज्वलित झाल्यासारखी वाटते. विशेष महापूजा, कुंभाभिषेक, ध्वजारोहण आणि लाखो भाविकांची उपस्थितीहे सर्व मिळून भग्नावस्थेतून पुनर्निर्माणाकडे आणि पुनरुत्थानाकडे झालेल्या अखंड प्रवासाची घोषणा करतात. सरदार पटेलांच्या दूरदृष्टीपासून आजच्या आत्मविश्वासपूर्ण भारतापर्यंतचा हा अखंड सांस्कृतिक प्रवाह आहे. ही परंपरा, कालातीत आणि प्रेरणादायी, प्रत्येक पिढीला आपल्या वारशाचे जतन करण्याचे, ऐक्याचे रक्षण करण्याचे आणि भारताच्या सनातन आत्म्यावर दृढ श्रद्धा ठेवत समृद्ध, सुसंवादी आणि अखंड भविष्याकडे वाटचाल करण्याचे आवाहन करते.

अमेरिकन लेखक मार्क ट्वेन यांनी एकदा म्हटले होते की वाराणसी इतिहास, परंपरा आणि आख्यायिकांपेक्षाही प्राचीन आहे. पण कदाचित त्यांनी प्रभास पाटण आणि सोमनाथ पाहिले नसावे. भागवत पुराणानुसार, चंद्राला त्याचे सासरे दक्ष यांनी शाप दिला होता. त्या शापातून मुक्त होण्यासाठी चंद्राने याच स्थळी भगवान शिवाची आराधना केली आणि म्हणूनच 'सोमनाथचंद्राचा अधिपती' हे नाव उदयास आले.

मंदिर उभे राहण्याच्या खूप आधीपासून प्रभास पाटण हे मानवी वस्तीचे केंद्र होते. इ.स.पू. ३०००पासून येथे शेती आणि पशुपालन करणारी पूर्व–हडप्पा संस्कृती अस्तित्वात होती. सिंधू संस्कृतीच्या ऱ्हासानंतरही येथे जीवन टिकून राहिले. येथे सापडलेली रेड पॉलिश्ड वेअर मातीची भांडी आणि प्रारंभीच्या लिपींचे पुरावे याची साक्ष देतात. इसवी सनाच्या प्रारंभीच्या शतकांत हे एक साधे, पण महत्वाचे नगर होते. समुद्रकिनाऱ्यालगत ७ ते १० मीटर खोलीवर सापडलेले दगडी नांगर प्राचीन सागरी व्यापाराचे साक्षीदार आहेत. हा किनारा केवळ निसर्गरम्य नव्हता, तर व्यापाराचे प्रवेशद्वार होता. येथे वस्ती आणि पवित्रता एकत्र वाढत गेली.

प्राचीन ग्रंथांमध्ये प्रभास क्षेत्राला तीर्थ म्हणून संबोधले आहे. महाभारतामध्ये भगवान कृष्णाच्या देहत्यागाचे स्थळ म्हणून प्रभासाचा उल्लेख आहे. दगडांनी अमरत्वाची भाषा शिकण्यापूर्वीच हा किनारा सांसारिक आणि आध्यात्मिक जगामधील एक पवित्र संगम होता. त्याची प्रारंभीची रूपे साधीलाकूड आणि गवताची असली, तरी ती मानवी मनाच्या दैवी शोधाची खूण होती.

इ.स. ६४९ च्या सुमारास वल्लभीच्या मैत्रक राजवटीत पहिले ऐतिहासिकदृष्ट्या प्रमाणित मंदिर उभे राहिले. पुढे ९व्या१०व्या शतकात चालुक्य/सोलंकी काळात सोमनाथ हे काशी आणि उज्जैनच्या बरोबरीचे प्रमुख तीर्थस्थान बनले. पुरातत्त्ववेत्ता बी.के. थापर यांना १९५०–५१मधील उत्खननात असलेले गर्भगृह, अंतराळ आणि सभामंडप यांचा समावेश असलेली भव्य रचना. पूर्वाभिमुख त्रि–अंग संधार प्रासादाचे अवशेष सापडले. लक्षुलीश मूर्तींच्या अवशेषांनी त्याची शैव परंपरा सिद्ध केली. विद्वान मंदिराच्या नेमक्या कालखंडावर मतभेद करतात, परंतु एक गोष्ट निर्विवाद आहेसोमनाथ त्या काळात अत्यंत वैभवशाली झाले होते आणि लवकरच त्याची कठोर परीक्षा होणार होती.

ही परीक्षा अनेक लाटांमध्ये आली. इ.स. ७२५मध्ये उमय्यद सेनापती जुनैद इब्न अब्द अल–रहमान अल–मुरीने हल्ला केला, जो पहिला इस्लामी आक्रमण मानला जातो. परंतु सर्वात मोठा आघात ८ जानेवारी १०२६ रोजी झाला, जेव्हा गझनीचा महमूद आपल्या पंधराव्या मोहिमेत सोमनाथावर चालून आला. शिवलिंग फोडण्यात आले, खजिना लुटण्यात आला. अल बिरुनी यांनी मंदिरातील संपत्तीचे वर्णन केले आहे. सोने, चांदी, मोती, रत्ने आणि गावांच्या महसुलातून जमा झालेली संपदा.

तथापि, पुरातत्त्वीय पुरावे दर्शवतात की मंदिराचे भग्नावशेष त्वरित एकत्र करून सुरक्षितपणे पुरले गेले. म्हणजेच, श्रद्धा उद्ध्वस्त झाली नव्हती. इ.स. १०३८मध्ये गोव्याच्या कदंब राजाने सोमनाथाला भेट दिली. यावरून पूजा–अर्चा किंवा पुनरुज्जीवनाची भावना त्वरित पुन्हा उभी राहिल्याचे दिसते. मंदिराचे रूप तुटले, पण संस्कृतीचे चेतन कायम राहिले.

पुढील काळातही विध्वंस आणि पुनर्निर्माण यांचे चक्र सुरूच राहिले. इ.स. ११६९मध्ये सोलंकी राजा कुमारपालाने पाचवे भव्य दगडी मंदिर उभारले. प्रभास पाटण येथील भद्रकाली मंदिरातील शिलालेखात त्याचा उल्लेख आहे.

यानंतर १२९९ मध्ये अलाउद्दीन खिलजीचा सेनापती उलुघ खानने मंदिर उद्ध्वस्त केले. स्थानिक रक्षक वाजा मालसुत आणि पदमल यांनी मंदिररक्षण करताना प्राण दिले. पुढे चुडासमा राजा महिपाल देव यांनी १३०८मध्ये मंदिराचे पुनर्निर्माण केले आणि त्यांचा पुत्र खेंडगाराने शिवलिंगाची पुनःप्रतिष्ठा केली.

यानंतर झफर खानने १३९५मध्ये मंदिर उद्ध्वस्त करून तेथे जामा मशिद आणि प्रशासकीय ठाणे उभारल्याचे उल्लेख आहेत. पुढे महमूद बेगडा, पोर्तुगीज आक्रमक, आणि नंतर औरंगजेब यांच्या आदेशाने १६६५ आणि १७०६मध्ये पुन्हा विध्वंस घडवून आणण्यात आला. पुजाऱ्यांची हत्या, मंदिर परिसरातील अपवित्र कृत्ये आणि संपूर्ण रचना पाडण्याचे प्रयत्न झाले; परंतु तीर्थक्षेत्र टिकून राहिले.

जरी मंदिर वारंवार उद्ध्वस्त झाले, तरी स्मृती कधीच नष्ट झाली नाही. इ.स. १७८२–८३ मध्ये पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या वैयक्तिक निधीतून सोमनाथाजवळ नवीन दगडी मंदिर उभारले. हे मंदिर १९व्या आणि २०व्या शतकात सोमनाथच्या श्रद्धेचे केंद्र राहिले.

१८४२मध्ये ब्रिटिश गव्हर्नर–जनरल लॉर्ड एलेनबरो यांनी अफगाणिस्तानातील महमूद गझनीच्या कबरीतून चंदनाचे दरवाजे आणले आणि ते सोमनाथचे मूळ दरवाजे असल्याचा खोटा दावा केला. हा ब्रिटिश सत्तेचा हिंदू समाजाचे समर्थन मिळवण्यासाठी आणि ब्रिटिश राजवटीला वैध ठरवण्यासाठी राजकीय प्रचार होता. हे दरवाजे नंतर आग्रा किल्ल्यात ठेवण्यात आले.

१९२२मध्ये के.एम. मुन्शी यांनी सोमनाथचे भग्नावशेष पाहिले. त्यांनी त्या अनुभवाचे वर्णन "भक्ती आणि लज्जा" असे केले आणि याच अनुभवातून त्यांच्या मनात मंदिर पुनर्निर्माणाची आजीवन बांधिलकी निर्माण झाली.

स्वातंत्र्यानंतर सोमनाथच्या इतिहासाचे अंतिम पर्व सुरू झाले. ऑक्टोबर १९४७मध्ये जुनागढ भारतात विलीन झाले आणि हिंदूंना मंदिर दुरुस्तीवरील बंदी हटवण्यात आली. १२१३ नोव्हेंबर १९४७ रोजी सरदार पटेल, एन. व्ही. गाडगीळ आणि जामसाहेब यांनी भग्नावशेषांना भेट दिली. तेव्हा पटेलांनी जाहीर केलेः "या शुभ नववर्षदिनी आम्ही सोमनाथ मंदिर पुनर्निर्माणाचा निर्णय घेतला आहे."

जुनागढ प्रशासन आणि जामसाहेबांनी तत्काळ देणग्या दिल्या. सुमारे ५,००० एकर जमीन मंदिर, संस्कृत विद्यापीठ आणि सांस्कृतिक केंद्रासाठी राखीव ठेवण्यात आली.

यानंतर वाद निर्माण झाला. महात्मा गांधींच्या सल्ल्यानुसार सरकारने थेट निधी न देता लोकवर्गणीतून मंदिर उभारण्याचा निर्णय घेतला, जेणेकरून हे राज्यप्राय धार्मिक प्रकल्प न राहता लोकसहभागातून उभे राहिलेले सांस्कृतिक पुनरुत्थान ठरेल.

दरम्यान, तत्कालीन प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरू यांनी या प्रकल्पाला 'हिंदू पुनरुत्थानवाद' म्हणून विरोध केला. परंतु सार्वजनिक देणग्यांमुळे प्रकल्प थांबवता आला नाही.

१५ डिसेंबर १९५० रोजी सरदार पटेल यांचे निधन झाले, तरी काम सुरूच राहिले. अखेर ११ मे १९५१ रोजी राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. सोमपुरा शिल्पकारांनी बांधलेल्या मारू–गुर्जर शैलीतील मंदिरात नवीन ज्योतिर्लिंगाची स्थापना झाली. शतकानुशतके कुजबुजत राहिलेली प्रतिज्ञा अखेर दगडात साकार झाली. नेहरू या समारंभाला उपस्थित नव्हते.

आज सोमनाथ हे केवळ पर्यटनस्थळ किंवा धार्मिक प्रतीक नाही; ते दगड आणि गाळात लिहिलेले भारतीय संस्कृतीचा इतिहासग्रंथ आहे. त्याची खरी ओळख अखंड वैभवात नसून प्रत्येक विध्वंसानंतर पुन्हा उभे राहण्याच्या मानवी निर्णयात आहे. त्याच्या पायाभूत थरांमध्ये हडप्पाकालीन वसाहती, प्राचीन व्यापारी आणि शांतीच्या शोधात आलेले भक्त सामावलेले आहेत. प्रत्येक पुनर्निर्माणमैत्रक राजे, सोलंकी सम्राट, मराठा राण्या किंवा नवस्वतंत्र भारत यांना "ही समाप्ती नाही; आम्ही पुन्हा उभारू" हा एक जाणीवपूर्वक केलेला उच्चार होता.

सोमनाथ आपल्याला शिकवते की लवचिकता म्हणजे कधीही न पडणे नव्हे, तर पडूनही कायमचे न राहणे पुन्हा पुन्हा उभे राहणे. समुद्रकिनारी उभे असलेले हे मंदिर केवळ भगवान शिवाचे स्मारक नाही; तर त्या अदम्य मानवी आत्म्याचे प्रतीक आहे, जो शतकानुशतके समुद्राच्या काठावर येऊन शांतपणे म्हणत राहतो,

"आम्ही अजूनही येथे आहोत. आम्ही स्मरण ठेवतो. आम्ही पुन्हा उभारतो. आम्ही टिकून राहतो."

**–ब्रिजेश सिंह,**
**प्रधान सचिव तथा महासंचालक,**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**



## बदलते तंत्रज्ञान

# इन्स्टा अकाउंट अचानक बॅन झालंय? असे होईल रिकव्हर

आजच्या डिजिटल युगात इन्स्टाग्राम हे केवळ मनोरंजनाचे साधन राहिलेले नाही, तर अनेकांसाठी ते उत्पन्नाचे आणि व्यवसायाचे मोठे व्यासपीठ बनले आहे. अशा परिस्थितीत, अचानक 'अकाउंट डिसेबल' किंवा 'सस्पेंड' झाल्याचा मेसेज आला की युजर्सची झोप उडते. मे २०२६मध्ये अनेक युजर्सनी अशा तक्रारी केल्या आहेत.



बहुतांश लोक केवळ ॲपमध्ये दिसणाऱ्या 'Appeal' बटणावर अवलंबून राहतात, पण अकाउंट परत मिळवण्यासाठी त्यापेक्षाही प्रभावी एक ऑफिशियल मार्ग उपलब्ध आहे.

**अकाउंट बॅन का होतं?**

इन्स्टाग्रामकडून अकाउंट ब्लॉक होण्यामागे अनेक कारणे असू शकतात. यामध्ये कम्युनिटी गाईडलाईन्सचे वारंवार उल्लंघन करणे, फॉलोअर्स वाढवण्यासाठी किंवा ऑटोमेशनसाठी अनधिकृत ॲप्स वापरणे, वारंवार चुकीचे लॉगिन किंवा संशयास्पद आयपीवरून लॉगिन करणे, ही कारणे असू शकतात. तर, अनेकदा इन्स्टाग्रामची स्वयंचलित प्रणाली चुकीच्या पद्धतीने खऱ्या युजर्सना स्पॅम समजून ब्लॉक करते.

अकाउंट परत मिळवण्यासाठी फॉलो करा या स्टेप्स.

१. **लॉगिनचा प्रयत्न करा** : सर्वात आधी नेहमीप्रमाणे लॉगिन करा. जर तिथे 'Learn More' किंवा 'Appeal' चा पर्याय आला, तर त्यावर क्लिक करून माहिती भरा.

२. **सेल्फी व्हेरिफिकेशन** : अनेकदा इन्स्टाग्राम तुमची ओळख पटवण्यासाठी व्हिडिओ सेल्फी किंवा ओळखपत्राची मागणी करते. ही प्रक्रिया अचूकपणे पूर्ण करा.

३. **मेटा रिकव्हरी पोर्टल** : मेटाच्या अधिकृत Help Center पोर्टलला भेट द्या आणि 'My Instagram Account Was Deactivated' हा फॉर्म शोधून तो भरा.

४. **ई–मेल चेक करा** : तुमच्या रजिस्टर्ड ईमेल आयडीचा 'इनबॉक्स' आणि 'स्पॅम' फोल्डर नियमित तपासा. रिकव्हरीशी संबंधित महत्त्वाच्या सूचना तिथेच पाठवल्या जातात.

**या चुका टाळा, अन्यथा अकाउंट कायमचं जाईल!**

सायबर तज्ज्ञांच्या मते, अकाऊंट बॅन झाल्यावर युजर्स वारंवार वेगळ्या डिव्हाइसवरून किंवा व्हीपीएन वापरून लॉगिन करण्याचा प्रयत्न करतात. यामुळे इन्स्टाग्रामला अधिक संशय येतो आणि अकाऊंट कायमस्वरूपी बंद होऊ शकते. तसेच फॉलोअर्स वाढवणारे ॲप्स त्वरित अनइंस्टॉल करा.

# प्रसिद्ध भावगीत गायिका माणिक वर्मा



निमित्त

माणिक वर्मा या मराठीतील नामवंत भावगीत गायिका होत्या. त्यांचा जन्म १६ मे १९२६ रोजी बळवंत दादरकर आणि हिराबाई दादरकर यांच्या पोटी झाला. हिराबाईंनी आपल्या मुलीची संगीताची गोडी लहानपणीच ओळखली आणि त्यांना एक कुशल गायिका होण्यासाठी व्यावसायिक प्रशिक्षण देण्याचा चंग बांधला, मात्र हा मार्ग सोपा नव्हता, कारण त्या काळी पारंपरिक संगीतामध्ये महिलांचा सहभाग निषिद्ध मानला जात होता.

माणिक वर्मा यांनी आपले प्रारंभिक प्रशिक्षण भारतीय गायन समाजात ज्येष्ठ गायक अप्पासाहेब भोपे यांच्याकडून घेतले. त्यानंतर ख्यातनाम गायक सुरेशबाबू माने, उस्ताद अझमत हुसेन खान, उस्ताद इनायत खान, भोलानाथ भट्ट आणि पं. जगन्नाथ बुवा पुरोहित यांच्याकडूनही पुढचे प्रशिक्षण घेतले. प्रख्यात गायिका हिराबाई बडोदेकर (सुरेशबाबू माने यांची बहीण) यांचादेखील माणिक वर्मा यांच्या गायकीवर प्रभाव होता. किराणा आणि आग्रा घराणा या दोन्हींचे प्रशिक्षण असले, तरी माणिकबाईंनी स्वतःची गायकी आत्मसात करण्यावर भर दिला. हळूवार आवाजाची लय कायम ठेवत त्यांनी पुढे नाव कमावले. वयाच्या १३व्या वर्षी त्यांनी सार्वजनिक कार्यक्रमांना सुरुवात केली. अवघ्या १५ वर्षांच्या असताना त्यांनी पहिल्या ध्वनिमुद्रिकेसाठी पार्श्वगायन केले, तर वयाच्या १७व्या वर्षी सूरत येथे पं. ओंकारनाथ ठाकूर यांनी आयोजित केलेल्या मैफलीत त्यांचे पहिले भव्य सादरीकरण झाले. मुंबई विद्यापीठातून कला शाखेत शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी पुण्याच्या गांधर्व महाविद्यालयातून संगीताचा अभ्यास केला. १९४७मध्ये वयाच्या २१व्या वर्षी त्यांनी कोलकात्याची तानसेन मैफल स्वतःच्या कलावंतांच्या जोरावर गाजवली. तिथून पुढे त्या हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतातील दिग्गज कलाकार म्हणून गणल्या जाऊ लागल्या.

पं. भीमसेन जोशी, पु.ल. देशपांडे, सुधीर फडके, श्रीनिवास खळे, मनोहर जोशी, यशवंत देव, पं. सी.आर. व्यास, प्रमोद नवलकर, गजानन वाटवे, ज्योत्स्ना भोळे, शांता शेळके, अप्पा जळगावकर, दत्ता डावजेकर, जयमाला शिलेदार, प्रभाकर जोग, मालती पांडे, सुनीता देशपांडे, अरविंद गजेंद्रगडकर, शैला दातार, योगिनी जोगळेकर, राम गबाले, सुनीता खाडिलकर, दत्ता मारुलकर, मधुवती दांडे यांसारख्या सर्व स्तरांतील नामवंत व्यक्तींनी त्यांच्या कौशल्याची प्रशंसा केली. संगीतातील सखोल प्रशिक्षणामुळे त्या मराठी भावगीते, भक्तीगीते आणि नाट्यगीते गायनात पारंगत झाल्या. बालगंधर्वांच्या संस्मरणीय रचनांच्या ध्वनिमुद्रिका रेकॉर्ड करण्याचे श्रेयही माणिकबाईंना जाते.

आकाशवाणीने माणिकबाईंची भजने आणि भक्तीगीते सुरू करून श्रोत्यांची सकाळ प्रसन्न केली. त्यामुळे त्या महाराष्ट्राच्या घराघरात पोहचल्या. एप्रिल १९५५मध्ये त्यांची गाणी 'गीत रामायण' मालिकेचा भाग बनली. आकाशवाणी पुणे केंद्राने दर आठवड्याला वर्षभर हा कार्यक्रम आयोजित केला होता. त्यांना त्यात ख्यातनाम गायिका लता मंगेशकर, योगिनी जोगळेकर, उषा अत्रे, बबनराव नवडीकर आणि सुधीर फडके यांचीही साथ लाभली.

माणिक बळवंत दादरकर यांनी १९४७मध्ये प्रख्यात लेखक आणि गीतकार अमर वर्मा यांच्याशी लग्न केले. या दाम्पत्याला चार मुली झाल्या. गायिका राणी वर्मा, अरुणा जयप्रकाश, प्रख्यात मराठी–हिंदी अभिनेत्री भारती आचरेकर आणि ख्यातनाम मराठी अभिनेत्री वंदना गुप्ते या चार मुलींनीही आपापल्या क्षेत्रात अमाप प्रसिद्धी मिळवली. माणिक वर्मा यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. वयाच्या ७०व्या वर्षी १० नोव्हेंबर १९९६ रोजी त्यांचे निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# नखे देऊ शकतात आरोग्य समस्यांचे संकेत

शरीरातील प्रत्येक अवयव आरोग्याविषयी काही ना काही संकेत देत असतो. त्यात नखेही अपवाद नाहीत. नखांचा रंग, आकार, पोत किंवा त्यावर दिसणारे बदल शरीरातील पोषणतत्त्वांची कमतरता, रक्तक्षय, त्वचारोग किंवा इतर आरोग्य समस्यांचे संकेत देऊ शकतात. त्यामुळे नखांकडे केवळ सौंदर्याच्या दृष्टीने नव्हे, तर आरोग्याच्या दृष्टीनेही पाहणे गरजेचे ठरत आहे, असे मत तज्ज्ञ डॉक्टरांनी व्यक्त केले तसेच नखांवरून आजाराचे संकेत मिळत असले, तरी विविध चाचण्या करून घेणे गरजेचे असल्याचेही डॉक्टरांनी सांगितले.



एखादी व्यक्ती आजारी पडली, तर निदानासाठी नखांची पाहणी आवश्यक असल्याचे तज्ज्ञांनी नमूद केले. तज्ज्ञ डॉक्टरांनी सांगितले, की नखांचा भाग केराटिन या प्रथिनांपासून बनलेला असल्याने ती टणक असतात. या ठिकाणी रक्तपुरवठा नसतो. तरीदेखील नखांवरील चिन्हाच्या सहाय्याने आजाराचे संकेत मिळू शकतात. हाताच्या आणि पायांच्या नखांचे संकेत जवळपास सारखेच आहेत. यामध्ये तज्ज्ञांनी काही उदाहरणेही दिली. नखे निळसर असतील, तर ऑक्सिजनची कमतरता अथवा हृदयविकाराचे संकेत देतात. नखे कोरडी होणे अथवा फुगलेली असतील तर पोषणाचा अभाव अथवा थॉयररॉईडची समस्या अधोरेखित करते.

आहार आणि नखांच्या आरोग्याचा जवळचा संबंध आहे. आहारात पालेभाज्या, फळे, दूध, दही यांचा समावेश मुबलक प्रमाणात असावा, असा सल्ला तज्ज्ञांनी आवर्जून दिला.

**नखे आणि चिन्हे**


* नखांवर लाटांसारखे दिसणे : संधिवाताचा त्रास
* नखे पिवळसर, फिकट दिसणे : मधुमेह, बुरशीजन्य आजार
* नखांवर पांढरे ठिपके : शरीरात खनिजे, प्रथिनांची कमतरता
* नखांखाली काळे, तपकिरी डाग : त्वचेच्या कर्करोगाची लक्षणे
* नखांवर खड्डे : लोह तत्त्वाचा अभाव
* ठिसूळ नखे : मॅग्नेशियमचा अभाव
* नखांवर लाल रेषा : हृदयाच्या झडपांचा आजार

**शरीर निरोगी असल्याचेही संकेत**

नखांचा रंग एकसारखा असणे, नखांवरील पृष्ठभाग गुळगुळीत असणे, नखांच्या छटा गुलाबीसर असणे, नखांवर कुठेही ठिपके, खड्डे, चिन्ह नसणे, नखांच्या कडाही समान पातळीवर असणे.

# लोकसहभागातून आरोग्य समृद्धीकडे विभागाची वाटचाल

**अलिबाग : प्रतिनिधी**




राज्यातील आरोग्यविषयक उपक्रम अधिक लोकाभिमुख, गतिमान आणि बळकट करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने विधानसभा मतदारसंघ, जिल्हा आणि राज्य स्तरावर 'एकात्मिक आरोग्यवर्धिनी समिती' स्थापन करण्याचा शासन निर्णय जारी केला आहे. सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून, राज्यातील आरोग्य संस्थांच्या कामकाजात अधिक समन्वय, गुणवत्ता सुधारणा आणि लोकसहभाग वाढविण्यावर भर देण्यात आला आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाचे वतीने राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे नेतृत्वाखाली एमआरआय, सिटी स्कॅन, डायलेसिस, स्टेमी प्रकल्प, टेलिमेडिसीन यासह अनेक दर्जेदार व मोफत आरोग्य सुविधा ग्रामपंचायत स्तरापासुन जिल्हा स्तरापर्यंत उपलब्ध करून दिल्या जात आहेत. आरोग्यसेवा लोकाभिमुख करण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने "माझ गाव आरोग्यसंपन्न गाव" हे महत्वपूर्ण अभियान सुरू आहे. त्याच महत्वकांक्षेने आरोग्य विभागाचे उपक्रम अधिक लोकाभिमुख, गतिमान आणि बळकट करण्यासाठी आरोग्य विभागाने विधानसभा मतदारसंघ, जिल्हा आणि राज्य स्तरावर एकात्मिक आरोग्यवर्धिनी समिती स्थापन करण्याचा शासन निर्णय जारी केला आहे. सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून, राज्यातील आरोग्य संस्थांच्या कामकाजात अधिक समन्वय, गुणवत्ता सुधारणा आणि लोकसहभाग वाढविण्यावर भर देण्यात आला आहे.

शासन निर्णयानुसार ग्रामीण विधानसभा मतदारसंघ, महानगरपालिका क्षेत्रातील विधानसभा मतदारसंघ, जिल्हा आणि राज्य स्तरावर स्वतंत्र "एकात्मिक आरोग्यवर्धिनी समिती" गठित करण्यात येणार आहे. ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील समितीचे अध्यक्ष संबंधित आमदार असतील, तर तालुका आरोग्य अधिकारी सदस्य सचिव म्हणून काम पाहतील. समितीत खासदार, विधान परिषद सदस्य निमंत्रित सदस्य असतील, तसेच जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सभापती, तहसीलदार, गटविकास अधिकारी, आरोग्य अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रतिनिधी, महिला व बालविकास विभागाचे प्रतिनिधी यांचा समावेश असेल. महानगरपालिका क्षेत्रातील समित्यांमध्ये संबंधित आमदार अध्यक्ष असून, महापौर, उपमहापौर, आरोग्य समिति सभापती, खासदार व विधान परिषद सदस्य निमंत्रित सदस्य असतील, तसेच महानगरपालिका सदस्य, शिक्षण व महिला-बालविकास विभागाचे प्रतिनिधी तसेच वैद्यकीय अधिका-यांचा सदस्य म्हणून समावेश आहे.

जिल्हा स्तरावरील समितीचे अध्यक्ष संबंधित जिल्ह्याचे पालकमंत्री असतील. समितीत खासदार, विधान परिषद आमदार, महापौर, उपमहापौर, आरोग्य समिती सभापती, निमंत्रित सदस्य असतील, तसेच जिल्हा परिषद अध्यक्ष, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, महानगरपालिका आयुक्त, जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा शल्यचिकित्सक यांचा समावेश असेल.

या समित्यांचे प्रमुख कार्य म्हणजे आरोग्य संस्थांमधील सेवा गुणवत्ता सुधारणे, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे, नागरिकांच्या आरोग्य समस्यांचे निराकरण करणे, विविध विभागांमध्ये समन्वय प्रस्थापित करणे आणि समुदाय सहभाग वाढविणे हे राहणार आहे. तसेच जन आरोग्य समिती, रुग्ण कल्याण समिती, महिला आरोग्य समिती आणि ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समित्यांच्या माध्यमातून आरोग्य सुविधांचे बळकटीकरण करण्यात येणार आहे.सर्व गावे व आरोग्य संस्थासाठी कार्यरत असलेल्या या समिती सदश्यांच्या शिफारसीवर विभागणे केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्याचे काम"एकात्मिक आरोग्यवर्धिनी समिती करेल. शासन निर्णयानुसार प्रत्येक समितीची दर तीन महिन्यांनी किमान एक बैठक घेणे बंधनकारक असून, समितीच्या बैठकीतील निर्णयांवर संबंधित अधिकार्यांनी निश्चित कालावधीत कार्यवाही करून अनुपालन अहवाल सादर करणे आवश्यक आहे. विधानसभा स्तरावरील समित्यांच्या कामकाजाचा आढावा जिल्हास्तर समिती घेणार आहे.

## उद्या अलिबागमध्ये होणार महापुरुषांच्या विचारांचा जागर

**अलिबाग : प्रतिनिधी**



डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती अलिबागच्या वतीने जगाच्या कल्याणात महत्त्वाची भूमिका असणाऱ्या महापुरुषांची तसेच महामातांची जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम अलिबाग येथील पी.एन.पी. नाट्यगृह येथे रविवारी ( दि. १७) होणार आहे. विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती अलिबागचे अध्यक्ष संजय जाधव यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

सकाळी १०.०० ते सायंकाळी ४.०० या कालाविधी दोन सत्रांमध्ये हा कार्यक्रम होणार आहे. पहिल्या सत्रामध्ये उद्‌घाटन होईल. विविध क्षेत्रांमध्ये कार्य केलेल्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. नारायण गायकवाड गुरुजी (सामाजिक क्षेत्र), नितीन राऊत (अंधश्रद्धा निर्मूलन क्षेत्र), ॲड. प्रसाद पाटील साहेब (शिक्षण क्षेत्र), सचिन कांबळे ( कला व सांस्कृतिक क्षेत्र), गोपाळ कांबळे (पत्रकारिता क्षेत्र) आणि डॉ. राजेंद्र चांदोरकर (वैद्यकीय क्षेत्र) यांच्या सत्कार केला जाणार आहे.

सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन, कायद्याने वागा लोकचळवळचे प्रणेते राज असारोंडकर, प्रा. डॉ. जयेश जाधव यांचे वैचारीक प्रबोधनपर मार्गदर्शन होईल. दुसऱ्या सत्रात सिनेमा दिग्दर्शक व नृत्य दिग्दर्शक सचिन कांबळे टीमबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर संगीतमय नाट्य सादर करणार आहेत, अशी महिती संजय जाधव यांनी यावेळी दिली.

यावेळी स्मारक समिती अध्यक्ष संजय जाधव यांच्या समवेत उपाध्यक्ष संतोष जाधव, सचिव उत्तम रसाळ, सहसचिव विजय गायकवाड, खजिनदार प्रदीप ओव्हाळ, अंजली गायकवाड, सविता ओव्हाळ, प्रफुल कानिटकर, मंगेश कानिटकर, नितीन गायकवाड, चंद्रकांत गायकवाड, धरमदास डवले, पांडुरंग कदम, संतोष शिंदे, ॲड. विशाल जाधव, जयप्रकाश पवार, मिलिंद जाधव, प्रा. डॉ. पी. बी. आचार्य आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## खालापुरात स्वामी समर्थ नवीन मठात प्राणप्रतिष्ठा सोहळा


**खोपोली** : शहरात नव्याने बांधण्यात आलेल्या स्वामी समर्थ मठात गुरुवारी विविध धार्मिक कार्यक्रमांनी आणि हजारो स्वामी भक्तांच्या उपस्थितीत नेत्रदीपक असा प्राणप्रतिष्ठापना सोहळा संपन्न झाला. शहरात चाळीस वर्षांपूर्वी नरहरी पाटील यांनी त्यांच्या राहत्या घरात स्वामी समर्थ मठाची स्थापना केली होती. कालांतराने स्वामींचा भव्य दिव्य असा मठ उभारणीसाठी त्याने पाठपुरावा सुरू ठेवला होता.

त्यांच्या निधनानंतर त्यात खंड पडला होता. परंतु खालापूरातील स्वामीभक्त, ग्रामस्थ सर्वांनी एकत्र येऊन नवीन मठाच्या उभारणीचे काम हाती घेत एक सुंदर मठ आकाराला आला आहे. नऊ मे पासून विविध धार्मिक कार्यक्रमाच्या आयोजन नवीन मठात करण्यात आले होते. गुरुवारी सकाळी श्री गणेश पूजन व न्यास पूजन, स्वामी समर्थांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना, महाआरती, होम हवन व नामस्मरण, महाप्रसाद, रुद्र हवन, पूर्णाहूती तसेच संगीत भजन असा सोहळा रंगला होता. पंचक्रोशीतून हजारो स्वामीभक्त दर्शनासाठी मठात येत होते. स्वामींची सुंदर अशी रांगोळी रेखाटण्यात आली होती.

## कोकण ज्ञानपीठ फार्मसी महाविद्यालयात पदवीदान समारंभ उत्साहात संपन्न

**कर्जत : प्रतिनिधी**

कोंकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयाचा पदवीदान समारंभ नुकताच संपन्न झाला. याप्रसंगी विद्यार्थी व पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कोंकण ज्ञानपीठ फार्मसी महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये पदवीदान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.



संस्थेचे उपाध्यक्ष प्रकाश मुथा यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून समारंभाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी सचिव प्रदीपचंद्र श्रृंगारपुरे, तेजराज जैन, अन्वेषा मुथा, महाविद्यालयीन विकास समिती सदस्य विजय मांडे, प्राचार्य डॉ. मोहन काळे, डॉ. विलास पिल्लेवान उपस्थित होते. डॉ. काळे यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविकात संस्थेची व महाविद्यालयाची माहिती सांगून विद्यार्थ्यांनी आपल्या ध्येयाकडे जाण्यासाठी खूप मेहनत घ्यावी. स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी आपल्याकडे विशेष कौशल्य हवे. त्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. भविष्यात उत्तम फार्मासिस्ट आणि जबाबदार नागरिक बना. तसेच विद्यार्थ्यांनी समाजसेवेची जाणीव ठेवून आपली प्रगती करावी, असे सांगितले.

अन्वेशा मुथा यांनी ' आता तुमची जबाबदारी वाढली आहे. तुमच्या हातात अनेकांचे जीवन आहे. आपण आत्मविश्वासाने सदैव सतर्क राहून काम करा.' असे सांगितले. प्रकाश मुथा यांनी, 'आज तुम्हाला चार वर्षांच्या मेहनतीचे फळ मिळत आहे. तुम्ही औषधे निर्माण करताना जसे मिली ग्रामचा वापर करता तसाच मीही सोन्याचा व्यापारी असल्याने मिली ग्रामशी संबंधित आहे. मी जसे शंभर टक्के सोन्याचे दागिने देतो तसे तुम्ही शंभर टक्के चांगली औषधे तयार करा. आपला दृष्टिकोन नेहमी सकारात्मक ठेवा. परदेशात गेलात तरी मातृभूमीला विसरू नका.' असा सल्ला दिला. फार्मसी महाविद्यालयातील पदवीधर विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदव्या प्रदान करण्यात आल्या. सूत्रसंचालन प्रा. सुष्मिता मजली व प्रा. सोनम सोनवणे यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. अश्विनी भोईर यांनी केले. यावेळी डॉ. निलोफर खान, डॉ. जितेंद्र यादव, डॉ. स्वप्नील फालक, प्रा. निलेश बोंडे, प्रा. स्वीटी भोपी, प्रा. श्वेता कर्वे, प्रा. धनश्री शिंदे, सविता म्हात्रे, पल्लवी जुईकर उपस्थित होते.

## आरोग्यवर्धक शेवळे बाजारात दाखल ; खवय्यांची चंगळ

**पाली** : पावसाळ्याच्या सुरुवातीला मिळणारी शेवळ ही रानभाजी नुकतीच जिल्ह्यात दाखल झाली आहे. अतिशय सकस व रुचकर असलेल्या या रानभाजीला सध्या खुप मागणी आहे. यामुळे अनेक आदिवासींनाही भाजी विकून दोन पैसे हाती मिळत आहेत.



या भाजीचे आगमन म्हणजे पावसाच्या आगमनाची चाहूल समजली जाते. हि भाजी तयार करण्यासाठी बोंडग्याचा पाला देखिल लागतो. कारण या पाल्यामुळे भाजी खवखवत नाही. त्यामुळे आदिवासी महिला शेवळ बरोबरच बोंडग्याचा पाला देखील जुडी सोबत ठेवतात. सध्या २० ते ४० रुपयांना शेवळ्याची जुडी मिळत आहे. खवय्ये नुकत्याच उपलब्ध झालेल्या या रानभाजीचा आनंद घेत आहेत. हि भाजी खाण्यास खुपच चविष्ट असते. तसेच आरोग्यास देखील उत्तम असते. केवळ विशिष्ट हंगामातच ही भाजी येत असल्यामुळे घरात आवर्जून हि भाजी बनवितो. घरातील मंडळी ती अतिशय चविने खातात. सध्या बाजारात लवकरच शेवळ उपलब्ध झाल्याने खूप आनंद होत आहे, असे पालीतील गृहिणी लता माळी यांनी सांगितले.


### जाहीर नोटीस

सर्व लोकास या जाहीर नोटीसीने असे कळवीण्यात येते की, मौजे वावर्ले ता. खालापूर, जिल्हा. रायगड येथील खालील प्रमाणे हक्क नोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे आशिलांनी संबंधित जमिन मालक श्रीम. बेला धरम गोधा. यांचेकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

| अ.क्र. | सर्व्हे नं | क्षेत्रफळ. हे. आर चौ मी | आकार रूपये पैसे |
|---|---|---|---|
| १ | १५३/२/अ | २-५४-०० | १.४४ |
| २ | १५८/अ | ०-७२-०० | २.४७ |

सबब सदर मिळकतीचा अगर कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज, तबदील, वारसा या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तकारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन चौदा (१४) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे खाली नमुद केलेल्या पत्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत अगर तकार आली नाही तर सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत व खरेदी घेणेस योग्य आहे असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तकारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहाणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती, तकारी कायमच्या सोडुन दिल्या आहेत असे समजणेत येईल हे सर्व लोकांस कळावे.

ठिकाण : रिस
दिनांक : १५/०५/२०२६

सही/-
ॲड. सचिन चाळके
बी.ए.एल.एल.बी
ऑफिस गोकुळ नगरी बिल्डींग पहिला मजला रुम. १०७, गाव रिस, ता. खालापूर- ४१०२२२ मो. ८६००९९०४६९

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्‌वारे कळविण्यात येते की, मौजे-धोदाणी, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या शेतीच्या मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावरील कब्जेदार सदरांत नमूद असलेल्या जमीन मालकांपैकी बाजी मिनु पटेल यांच्या मालकीच्या क्षेत्रामधून खालील नमुद क्षेत्र आमचे अशिलांनी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे-धोदाणी, ता. पनवेल, जि. रायगड**

| जमीन मालकांचे नांव | भुमापन क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.प्रति) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|
| | ४३/६/३/२/अ | ५-८४-३५<br>पो.ख. ०-६०-००<br>६-४४-३५<br>पैकी | ११=४७ |
| बाजी मिनु पटेल (खाते क्र.५४३) | | ०-७६-६८ | १=५१ |

**बाजी मिनु पटेल यांचे मालकीचे क्षेत्रापैकी ०-२०-०० हे.आर.पॉ. इतक्या वर्णनाच्या मिळकतीबाबत**

सदर शेतजमिनीवर कोणाचा, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळवहिवाट, ताबेकब्जा, बोजा, एम.ओ.यू., साठेकरार, वचन चिठठी, बयाणापावती, फरोक्त खत, खरेदीखत, मृत्यूपत्र, गहाण, दान, बक्षिस, लीज, लिन, पोटगी हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांच्या लेखी हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आंत योग्य त्या सकृत दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशील सदर शेतजमिनीचा खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व त्या आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, कृपया यांची नोंद घ्यावी.

ठिकाणः- पनवेल
दिनांकः- १५/०५/२०२६

सही/-
ॲड. स्वप्नेश संजय घरत
ऑफिस क्र.१, पहिला मजला, ए विंग, यशोकिरण को. ऑ. हौ. सोसा., सावरकर चौक, पनवेल-४१०२०६, ता. पनवेल, जि. रायगड
मो. ६९९०३६४३२/८३६९४९४३४१

### जाहीर नोटीस

सर्व लोकास या जाहीर नोटीसीने असे कळवीण्यात येते की, मौजे वावर्ले, ता. खालापूर, जिल्हा. रायगड येथील खालील प्रमाने हक्क नोंदीस वर्णन असलेली बिनशेती जमीन मिळकत आमचे आशिलांनी संबंधित जमिन मालक श्रीम. बेला धरम गोधा यांचेकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

| अ.क्र. | सर्व्हे नं./प्लॉट नं. | क्षेत्रफळ. आर.चौ मी | आकार रूपये पैसे |
|---|---|---|---|
| १ | १५३/१/अ | ३.०७.०० | ३०.७० |
| २ | १५३/३ | २.७८.०० | २७.८० |
| ३ | १५३/४ | ४.७०,०० | ४७.०० |
| ४ | १५३/५ | २.९३.०० | २९.३० |
| ५ | १५३/६ | २.९३,०० | २९.३० |
| ६ | १५३/७ | ७.२५.०० | ७२.५० |
| ७ | १५३/८ | १०.४५.०० | १०४.५० |
| ८ | १५३/९ | २.८०.०० | २८.०० |
| ९ | १५३/१० | २.९३.०० | २९.३० |
| १० | १५३/११ | २.९७.०० | २९.७० |
| ११ | १५३/१२ | ४.१६.०० | ४१.६० |
| १२ | १५३/१३ | ४.२०.०० | ४२.०० |
| १३ | १५३/१४ | ३.४०.०० | ३४.०० |
| १४ | १५३/१५ | ४.२५,०० | ४२.५० |
| १५ | १५३/१६ | ३.८३.०० | ३८.३० |
| १६ | १५३/१७ | ३.२३.०० | ३२.३० |
| १७ | १५३/१८ | ३.००.०० | ३०.३० |
| १८ | १५३/१९ | ३.०३.०० | ३०.३० |
| १९ | १५३/२० | २.८०.०० | २८.०० |
| २० | १५३/२१ | ३.३८.०० | ३३.८० |
| २१ | १५३/२२ | ३.१५.०० | ३१.५० |
| २२ | १५३/२३ | ३.२६.०० | ३२.६० |
| २३ | १५३/२४ | ३.०५.०० | ३०.५० |
| २४ | १५३/२५ | २.८०.०० | २८.०० |
| २५ | १५३/२६ | २.६६.०० | २६.६० |
| २६ | १५३/२७ | २.८५.०० | २८.५० |
| २७ | १५३/२८ | ३.१४.०० | ३१.४० |
| २८ | १५३/२९ | ३.०४.०० | ३०.४० |
| २९ | १५३/३० | ३.१३.०० | ३१.३० |
| ३० | १५३/३१ | ३.०५.०० | ३०.५० |
| ३१ | १५३/३२ | ३.१५.०० | ३१.५० |
| ३२ | १५३/३३ | ३.७०.०० | ३७.०० |
| ३३ | १५३/३४ | २.८३.०० | २८.३० |
| ३४ | १५३/३५ | २.९१.०० | २९.१० |
| ३५ | १५३/३६ | २.९१.०० | २९.१० |
| ३६ | १५३/३७ | २.९१.०० | २९.१० |
| ३७ | १५३/३८ | २.८३.०० | २८.३० |
| ३८ | १५३/३९ | २.८३.०० | २८.३० |
| ३९ | १५३/ ४० | २.९१.०० | २९.१० |
| ४० | १५३/४१ | २.९१.०० | २९.१० |
| ४१ | १५३/७७ | ९,६०.०० | ९६.०० |
| ४२ | १५३/७८ | ११.१०.०० | १११.०० |

सबब सदर मिळकतीचा अगर कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज, तबदील, वारसा या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तकारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन चौदा (१४) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे खाली नमुद केलेल्या पत्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत अगर तकार आली नाही तर सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत व खरेदी घेणेस योग्य आहे असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तकारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहाणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती, तकारी कायमच्या सोडुन दिल्या आहेत असे समजणेत येईल हे सर्व लोकांस कळावे.

ठिकाण : रिस
दिनांक : १५/०५/२०२६

सही/-
ॲड. सचिन चाळके
बी.ए.एल.एल.बी
ऑफिस गोकुळ नगरी बिल्डींग पहिला मजला रुम. १०७, गाव रिस, ता. खालापूर- ४१०२२२ मो. ८६००९९०४६९

# नवी मुंबईकर रेल्वे प्रवाशांचा प्रवास होणार सुखकर

## सिडकोच्या अखत्यारितील स्थानके मध्य रेल्वेकडे लवकरच हस्तांतरित

**नवी मुंबई : बातमीदार**

मध्ये रेल्वे आणि सिडको प्रशासन यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळे गेली अनेक वर्ष नवी मुंबईकर रेल्वे प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत. दोन्ही प्राधिकरणे एकमेकांकडे बोट दाखवत असल्याने रेल्वे प्रवासी मात्र यात भरडला जात होता. खासदार नरेश म्हस्के यांनी याची गंभीर दखल घेत दोन्ही प्राधिकरणातील अधिकाऱ्यांचा समन्वय घडवून आणत आज नवी मुंबईतील शिवसेना पदाधिकाऱ्यांसह छत्रपती शिवाजी महाराज स्थानक येथील मुख्यालयात बैठक घेतली. या बैठकीत सकारात्मक चर्चा होऊन येत्या ६ महिन्यात सिडकोच्या अखत्यारीतील सर्व स्थानके मध्ये रेल्वेकडे हस्तांतरण, पावसाळापूर्व कामे, दैनंदिन कामे करण्याचे रेल्वे प्रशासनाने मान्य केल्याने आता नवी मुंबईकर रेल्वे प्रवाशांचा प्रवास सुखकर होणार आहे.



नवी मुंबई परिसरातील रेल्वे स्थानकांच्या दुरवस्थेबाबत आणि तेथील अपुऱ्या प्रवासी सुविधांबाबत खासदार म्हणून नरेश म्हस्के यांनी पदभार स्वीकारल्यापासून प्रवाशांच्या सतत तक्रारी प्राप्त होत होत्या. या समस्यांची दखल खासदार नरेश म्हस्के घेतली होती. 'रेल्वे सल्लागार समिती' चे सदस्य या नात्याने समितीच्या दिल्ली येथे होणाऱ्या बैठकांमध्ये खासदार नरेश म्हस्के यांनी हा विषय वारंवार मांडला. स्थानकांची झालेली पडझड, देखभालीचा अभाव आणि सुरक्षेचा प्रश्न यामुळे सामान्य प्रवाशांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत असल्याचे निदर्शनास आणून दिले होते.

तसेच वाशी ते बेलापूर आणि खारघर ते खांदेश्वर या स्थानकांसाठीचे देखभाल करार अनुक्रमे २००३ आणि २००८ मध्ये संपले आहेत. त्यानंतर कोणताही नवा करार झालेला नाही. तर धक्कादायक बाब म्हणजे ऐरोली, रबाळे, घणसोली, कोपरखैरणे, तुर्भे, बामणडोंगरी, खारकोपर आणि खारघर या स्थानकांसाठी आजतागायत एकही देखभाल करार करण्यात आलेला नाही. या गोष्टी खासदार नरेश म्हस्के यांनी निदर्शनास आणून दिल्यानंतर याची गंभीर दखल घेत रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी हा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याचे निर्देश रेल्वे प्रशासनाला दिले.

नवी मुंबई परिसरातील रेल्वे कॉरिडॉरवरील स्थानकांचे व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी, सिडकोच्या अखत्यारीतील स्थानके अधिकृतपणे मध्य रेल्वेकडे हस्तांतरित करण्याची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण होणे अत्यंत आवश्यक असल्याची बाब खासदार नरेश म्हस्के यांनी आजच्या बैठकीच्या पारंभी व्यक्त केली.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, हायवेचे ६- लेनिंग आणि आगामी नव्याने होणारी मुंबई यांसारख्या विविध प्रकल्पांमुळे नवी मुंबईचा विकास आंतरराष्ट्रीय स्तरावर होत आहे. या सर्व प्रकल्पांमुळे विद्यमान रेल्वे पायाभूत सुविधांवर प्रचंड ताण येणार आहे. त्यामुळे तातडीने सिडकोच्या अखत्यारीतील सर्व स्थानके (मानखुर्द-बेलापूर, ठाणे-तुर्भे-वाशी-नेरुळ, नेरुळ-उरण मार्ग) अधिकृतपणे मध्य रेल्वेकडे हस्तांतरित करण्यात यावी, देखभाल आणि दुरुस्तीची कामे तातडीने करण्यात यावीत, 'अमृत भारत' योजनेअंतर्गत नवी मुंबईतील स्थानकांचे नूतनीकरण करुन कायापालट करावा, रेल्वे स्थानकांतील बंद असलेल्या तिकीट बुकिंग खिडक्या उघडाव्यात, रबाळे, दिघा, ऐरोली स्थानक परिसरातील भुयारी मार्ग, फूट ओव्हर ब्रिजचे काम सुरु करावे, अशी सूचना खासदार नरेश म्हस्के यांनी बैठकीत केली.

पंतप्रधान आणि रेल्वे मंत्र्यांनी भारतीय रेल्वेला देशाच्या विकासाचे इंजिन बनवण्याचे स्वप्न पाहिले आहे. मात्र, या प्रलंबित मुद्यांमुळे नवी मुंबईतील आणि विशेषतः माझ्या मतदारसंघातील प्रवाशांना सध्या त्रास सहन करावा लागत असल्याने तातडीने उपाययोजना करण्याची सूचना खासदार नरेश म्हस्के यांनी केली. रेल्वे अधिकाऱ्यांनी खासदार नरेश म्हस्के यांनी केलेल्या मागण्या व सूचना यांनुसार स्थानके हस्तांतरीत करण्याची प्रक्रिया येत्या ६ महिन्यात पूर्ण करण्याचे मान्य केले. तसेच पावसाळापूर्व सर्व कामे आणि दैनंदिन कामे मध्ये रेल्वे प्रशासन करेल असे लेखी पात्र येत्या आठवड्यात देण्याचे रेल्वे अधिकाऱ्यांनी मान्य केले.

बैठकीला सिडकोच्या वतीने जीएमडी डॉ. राजा दयानिधी आणि इतर अधिकारी, मध्य रेल्वेचे वरिष्ठ प्रिन्सिपल चीफ इंजिनिअर रजनीश माथूर, चीफ इंजिनिअर नवीन पाटील आदी अधिकारी, नवी मुंबई शिवसेना जिल्हाप्रमुख द्वारकानाथ भोईर, माजी उपमहापौर रमाकांत म्हात्रे, नगरसेवक अनिकेत म्हात्रे, भावेश पाटील, ज्ञानेश्वर जाधव, दिनेश जाधव आणि शिवसैनिक उपस्थित होते.

# उरण शहरात लवकरच सुरू होणार पोस्ट कार्यालय

**उरण : बातमीदार**

गेली अनेक महिने उरणच्या नागरिकांना पोस्ट कार्यालयाच्या व्यवहारासाठी जेएनपीटी टाऊनशिप येथे जावे लागत होते. पूर्वी उरण शहरात असलेले पोस्ट कार्यालय जेएनपीटी टाऊनशिप येथे हलविल्याने जेष्ठ नागरिक, विद्यार्थी, स्त्रिया आदी व्यक्तींना विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे. मात्र हे जेएनपीटी टाऊनशिपला असलेले कार्यालय पुन्हा उरण शहरात कार्यरत होणार आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

उरण शहरातील आनंदनगर येथील जुन्या पोस्ट कार्यालयाची इमारत पुनर्विकासासाठी गेल्यानंतर हे कार्यालय तात्पुरत्या स्वरूपात जेएनपीटी शॉपिंग सेंटर येथे हलविण्यात आले होते. मात्र, शहरापासून दूर गेलेल्या या कार्यालयामुळे नागरिकांना अतिरिक्त प्रवास खर्च, वेळेचा अपव्यय आणि अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. यामुळे पोस्ट कार्यालय पुन्हा शहरात सुरू करण्याची मागणी नागरिकांकडून सातत्याने केली जात होती. अखेर या मागणीला यश आले असून, लवकरच उरण शहरात नव्या ठिकाणी पोस्ट कार्यालय सुरू करण्यात येणार आहे. कामठा रस्त्यावरील शामियाना हॉटेलसमोरील युनियन बँकेच्या वरच्या मजल्यावर हे पोस्ट कार्यालय सुरू होणार आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना पेन्शन, बचत खाते, मनीऑर्डर, पोस्टल व्यवहार तसेच विविध शासकीय कामांसाठी वारंवार पोस्ट कार्यालयात जावे लागते. महिला वर्गालाही दैनंदिन व्यवहारांसाठी मोठी गैरसोय होत होती. आता पोस्ट कार्यालय पुन्हा शहरात सुरू होत असल्याने नागरिकांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.उरण शहरात पोस्ट कार्यालय सुरु होणार असल्यामुळे नागरिकांच्या वेळ व पैशाची, श्रमाची बचत होणार असल्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केल आहे.

# गव्हाण विद्यालयाचे रवींद्र भोईर 'रयत'च्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्यपदी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण कोपर येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ.भगत ज्युनिअर कॉलेजचे उपक्रमशील उपशिक्षक तसेच रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र शालिक भोईर यांची संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्यपदी निवड करण्यात आली आहे.

रवींद्र भोईर हे उपक्रमशील अध्यापक तसेच अटल टिंकरिंग विभागाचे प्रमुख, परीक्षा विभागाचे प्रमुख म्हणून कार्यरत असून संस्थेचा आदर्श गुरुकुल प्रमुख हा पुरस्कारही त्यांना याआधी प्राप्त झाला आहे.



या निवडीबद्दल भोईर यांनी संस्थेचे थोर देणगीदार व ज्येष्ठ मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेऊन आशीर्वाद घेतले असता त्यांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

याशिवाय आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी, विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, वाय.टी. देशमुख, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील, पंचायत समिती सदस्य वितेश म्हात्रे, गव्हाण विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर, विश्वनाथ कोळी व ॲड.राहुल घरत, माजी उपसरपंच विजय घरत, ज्येष्ठ शिक्षक नेते संजय भगत, मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व टी. एन.घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन भार्गवशेठ ठाकूर, विद्यालयाच्या प्राचार्य व लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, जगदीश घरत, निलेश खारकर, युवा नेते सुहास गोंधळी, नंदकुमार ठाकूर, धीरज ओवळेकर, व प्रणय कडू, ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख संजय उगले आदींनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# दिवाळे कोळीवाड्यात योग शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**

वाढत्या धकाधकीच्या जीवनशैलीमुळे नागरिकांमध्ये लठ्ठपणा, तणाव, सांधेदुखी आणि हाडांच्या विकारांचे प्रमाण झपाट्याने वाढत असताना आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देणारे पाच दिवसीय मोफत योग शिबिर दिवाळे कोळीवाडा येथे उत्साहात पार पडले. भारतीय योग संस्थान, दिल्ली (जिल्हा-नवी मुंबई) यांच्या वतीने आयोजित या उपक्रमाला पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने प्रतिसाद दिला.



हे शिबीर १० ते १४ मे दरम्यान ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र, दिवाळे कोळीवाडा येथे आयोजित शिबिरामध्ये विविध वयोगटातील नागरिकांनी सहभागी होत आरोग्यवर्धक योगाभ्यासाचा लाभ घेतला. बेलापूर परिसरातील नागरिकांसाठी हे शिबिर आरोग्यसाक्षरतेची एक उत्तम संधी ठरले. शिबिरात तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली विविध योगासने, प्राणायाम, ध्यानधारणा तसेच संतुलित आहार आणि सकारात्मक जीवनशैली याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच मानसिक तणाव कमी होऊन मन शांत राहते आणि एकाग्रता वाढण्यास मदत होते, असे तज्ज्ञांनी यावेळी सांगितले.

विशेषतः लठ्ठपणा नियंत्रण, पाठदुखी, सांधेदुखी आणि दैनंदिन तणावावर मात करण्यासाठी योग प्रभावी उपाय असल्याचेही शिबिरात अधोरेखित करण्यात आले. या शिबिरात मार्गदर्शक म्हणून राजकुमारी सिंह, शिबिर प्रमुख म्हणून जनार्दन सिंह यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

तसेच देवा फाउंडेशनच्या माध्यमातून भूषण गंगेश कोळी यांच्या पुढाकाराने हा आरोग्यदायी उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला.

# खारघर येथे आज परिणीता सन्मान सोहळा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

परिणीता सोशल फाऊंडेशन आयोजित पाचवा परिणीता सन्मान सोहळा शनिवार, दि. १६ मे रोजी सायंकाळी लिटिल वर्ल्ड मॉल, खारघर येथे. राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. .

प्रसिद्ध चित्रपट अभिनेत्री, दिग्दर्शिका आणि निर्मात्या अमृता राव या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत, तर इव्हेंट मॅनेजमेंट तज्ज्ञ मानसी इंगळे या प्रमुख पाहुण्या असणार आहेत. प्रसिद्ध टीव्ही एंकर लेखिका आणि सूत्रसंचालिका डॉ. मृण्मयी भजक या सोहळ्याचं सूत्रसंचालन करणार आहेत. पुण्यातील प्रसिद्ध औटी ग्रुपचे संचालक बाबासाहेब लक्ष्मण औटी, टीआयपीएल कंपनीचे संचालक नगरसेवक परेश ठाकूर, अल्ट्रा लूबचे संचालक सिद्धेश सावंत, अवधून पॅकवेल इंडस्ट्रीजचे संचालक स्वप्निल गुप्ते, नगरसेवक ॲड. प्रथमेश सोमण, मधुराज बिल्डर्सचे मधु पाटील यांचे या सोहळ्याला विशेष सहकार्य लाभले आहे.

यावर्षी सेलिब्रेटी पुरस्कार परिणीता सोशल फाऊंडेशनने रिसर्चमधून घोषीत केले आहेत. यात सुप्रसिद्ध समाजसेविका ममता सिंधुताई, अभिनेत्री आदिती सारंगधर, रसिका वेंगुर्लेकर, नृत्यदिग्दर्शिका फुलवा खामकर, बरवा कॉस्मॅटिकच्या संचालिका कामाक्षी बर्वे, निरगुडकर फार्म्सच्या संचालिका मंजिरी निरगुडकर राव, रायगड़ जिल्ह्याच्या डीवायएसपी माया मोरे, उदयोन्मुख गझल गायिका डॉ. भाग्यश्री पांचाळे आणि सुप्रसिद्ध शेफ आरती निजापकर यांचा समावेश आहे.

परिणीता सन्मानसाठी यावर्षी राज्यभरातून १५०हून अधिक अर्ज आले, त्यातून काही जणीची निवड प्रत्यक्ष पुरस्कारांसाठी करण्यात आली आहे. यात आयुर्वेद तज्ज्ञ डॉ. सुषमा पाटील, अमृत फूड प्रोडक्ट, अहिल्यानगरच्या संचालिका मीरा बेरड, कॉम्सॅटोलॉजिस्ट डॉ. निवेदिता मोरे, उद्योजिका रेश्मा कुरुप, रितिका किचन, पनवेलच्या संचालिका रितिका गायकवाड, हायकोर्टच्या वकील ॲड. संतोषी चव्हाण, ग्राफिक्स डिझायनर सुचेता अराणके, उद्योजिका वृषाली पाटील, योग प्रशिक्षिका शिल्पा कटरनवरे आणि बँकर नमिता लोखंडे यांचा समावेश आहे.

# अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघाच्या कार्य समितीची बैठक

**उरण : वार्ताहर**

अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघाच्या राष्ट्रीय कार्य समितीची महत्त्वपूर्ण बैठक दिनांक ९ मे रोजी जाट धर्मशाळा सभागृह कुरूक्षेत्र (हरियाणा) येथे राष्ट्रीय अध्यक्ष बसवराज गुरीकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी हरियाणा राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष तरूण सुहाग यांनी प्रास्ताविक केले. यावेळी उपस्थित मान्यवर तसेच विविध राज्यांतील प्रतिनिधींचा हरियाणा राज्य संघाच्या वतीने स्वागत व सत्कार करण्यात आला.राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत शिक्षकांच्या विविध प्रश्नांवर सखोल चर्चा करण्यात आली.



अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने "एक देश -एक पेन्शन ",एक देश -एक शिक्षण " आणि "एक देश-शिक्षकांना समान वेतन " या त्रिसूत्रीच्या मागण्या वेतन आयोगासमोर मांडण्यात येणार असून पुढील आठवड्यात विस्तृत मसुदा आयोगाला सादर करण्यात येणार आहे.बैठकीत 'स्कूल कॉम्प्लेक्स' संकल्पनेला विरोध नोंदविण्यात आला. शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा बोजा कमी करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. यासाठी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघाचे ३० वे राष्ट्रीय अधिवेशन २०२७ मध्ये कर्नाटक राज्यात आयोजित करण्याचा निर्णय सभेत घेण्यात आला.या बैठकीसाठी महाराष्ट्रातून राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष देविदास बस्वदे यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरचिटणीस कल्याण लवांडे तसेच राज्य कार्याध्यक्ष आण्णाजी आडे उपस्थित होते.या राष्ट्रीय कार्य समिती बैठकीस भारतातील २४ राज्यांतील प्रतिनिधींनी सहभाग नोंदविला. असल्याची माहती अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाच्या महिला सेल सरचिटणीस रंजना संजय केणी यांनी दिली.

# अदाणी एअरपोर्ट होल्डिंग्स आणि आयएचजी हॉटेल्समध्ये करार

## किम्पटन ब्रँडचे भारतात पदार्पण

**नवी मुंबई : बातमीदार**

अदाणी एअरपोर्ट होल्डिंग्स लिमिटेड (एएएचएल) आणि आयएचजी हॉटेल्स अँड रिसॉर्ट्स यांनी पाच हॉटेल्ससाठी पोर्टफोलिओ करारावर स्वाक्षरी केली आहे. या अंतर्गत भारतातील प्रमुख विमानतळे आणि व्यावसायिक ठिकाणांवर जवळपास १,५०० पेक्षा जास्त रूम्सची भर पडणार आहे. या भागीदारीमुळे आयएचजीचा लक्झरी लाइफस्टाइल बुटीक ब्रँड किम्पटन हॉटेल्स अँड रेस्टॉरंट्स भारतात पदार्पण करत आहे.



ही हॉटेल्स नवी मुंबई, जयपूर, मंगळुरू, तिरुवनंतपुरम आणि मुंबई महानगर प्रदेश (एमएमआर) मध्ये विकसित केली जातील, ज्यामुळे प्रमुख विमान वाहतूक आणि शहरी विकास क्षेत्रांमधील हॉस्पिटॅलिटी पायाभूत सुविधा अधिक प्रबळ होतील.

भारतातील सर्वात मोठी खाजगी विमानतळ ऑपरेटर अदाणी एअरपोर्ट होल्डिंग्स लिमिटेड (एएएचएल) आणि जगातील आघाडीची हॉस्पिटॅलिटी कंपनी आयएचजी हॉटेल्स अँड रिसॉर्टस यांनी भारतातील प्रमुख विमानतळ संलग्न आणि वेगाने विकसित होणाऱ्या शहरी भागांत पाच हॉटेल्स विकसित करण्यासाठी एका ऐतिहासिक करारावर स्वाक्षरी केली आहे. या पोर्टफोलिओमध्ये जयपूरमधील किम्पटन हॉटेलसह अदानी एअरपोर्ट सिटीजचा भाग असलेल्या आगामी हॉस्पिटॅलिटी-आधारित मिक्स्ड-युज प्रकल्पांतर्गत हॉलिडे इन आणि हॉलिडे इन एक्सप्रेस हॉटेल्सचा समावेश आहे.

या भागीदारीमुळे किम्पटन हॉटेल्स अँड रेस्टॉरंट्स ब्रँडचे भारतात पदार्पण होत आहे. जगभरात आपल्या नाविन्यपूर्ण डिझाइन, उत्कृष्ट खानपान अनुभव आणि लक्झरी बुटीक स्थानासाठी प्रसिद्ध असलेल्या किम्पटनच्या आगमनामधून भारतातील प्रीमियम लाइफस्टाइल आदरातिथ्य अनुभवांची वाढती मागणी दिसून येते. भारतातील विमान वाहतूक आणि पर्यटन क्षेत्रातील व्यापक वाढीच्या पार्श्वभूमीवर ही घोषणा करण्यात आली आहे. वाढती प्रवासी संख्या देशांतर्गत पर्यटन आणि व्यावसायिक प्रवासाची मागणी

यामुळे विमानतळ-केंद्रित होणारा विकास आता महत्त्वाचे हॉस्पिटॅलिटी आणि व्यावसायिक केंद्र उदयास आणत आहे.अदाणी एंटरप्रायजेस लिमिटेडचे (एईएल) डायरेक्टर प्रणव अदाणी म्हणाले, "अदाणी ग्रुप हॉस्पिटॅलिटी आणि विमानतळ-केंद्रित शहरी पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात आपला विस्तार करत असताना भारतातील वेगाने वाढणाऱ्या विमान वाहतूक परिसंस्थेभोवती प्रवास, मुक्काम आणि शहरी अनुभवांचा संयोजन असलेली जागतिक दर्जाची ठिकाणे निर्माण करणे हा आमचा दृष्टिकोन आहे.

भारतातील सर्वात मोठी खाजगी विमानतळ ऑपरेटर एएएचएल आपल्या विस्तारत असलेल्या विमानतळ नेटवर्कद्वारे दरवर्षी लाखो प्रवाशांना सेवा देते. कंपनी विमानतळांकडे फक्त प्रवासाचे साधन म्हणून न पाहता आदरातिथ्य, रिटेल, व्यावसायिक आणि सामाजिक पायाभूत सुविधांचे संयोजन असलेली एकात्मिक शहरी परिसंस्था म्हणून विकसित करत आहे. प्रमुख शहरांमध्ये सुमारे ६६३ एकरवर पसरलेल्या आपल्या एअरपोर्ट सिटी विकासाच्या माध्यमातून एएएचएल प्रवासाचा अनुभव समृद्ध करण्यासोबत दीर्घकालीन आर्थिक आणि शहरी विकासाला चालना देणारी मिक्स्ड-युज ठिकाणे निर्माण करत आहे.

आयएचजी हॉटेल्स अँड रिसॉर्ट्सचे साऊथ वेस्ट आशियाचे व्यवस्थापकीय संचालक सुदीप जैन म्हणाले, "अदानी एअरपोर्ट होल्डिंग्जसोबत या सहयोगामधून भारतामधील हॉस्पिटॅलिटी क्षेत्रातील संधींचा विस्तार दिसून येतो. विशेषतः मुख्य प्रवेशद्वारे असलेली शहरे आणि विमानतळ आधारित प्रकल्पांमध्ये व्यवसाय, पर्यटन आणि ट्रान्झिट प्रवाशांकडून मोठी मागणी दिसून येत आहे. लक्झरी, प्रीमियम आणि आवश्यक ब्रँड्सच्या मिश्रणासह हा पोर्टफोलिओ आम्हाला देशभरातील वेगाने वाढणाऱ्या बाजारपेठांमध्ये आमची उपस्थिती अर्थपूर्णरीत्या दृढ करण्यास मदत करेल. हा करार आमच्यासाठी महत्त्वाचा टप्पा आहे.

# गव्हाणचे माजी उपसरपंच रामदासशेठ ठाकूर यांचे निधन

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**



गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच तथा ग्रामस्थ मंडळ कोपरचे अध्यक्ष रामदास पांडुरंग ठाकूर यांचे गुरुवार दि. १४ मे रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. पनवेल तालुक्यातील ज्येष्ठ सामाजिक व राजकिय कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख होती. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे ते ज्येष्ठ कार्यकर्ते होते.

मोरु नारायण म्हात्रे विद्यालय व तुकाराम नारायण घरत ज्यु. कॉलेज तथा रामशेठ ठाकुर पब्लिक स्कुल उलवे चे चेअरमन. भार्गवशेठ ठाकूर यांचे ते वडील होते. त्यांच्या पश्चात त्यांची तीन मुले, सुना, मुलगी व नातवंडे असा परिवार आहे . त्यांच्या जाण्याने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

या वेळी माजी खासदार रामशेठ ठाकूर ,आमदार प्रशांत ठाकूर , जे. एम. म्हात्रे, महेंद्र घरत, परेश ठाकूर, वसंतशेठ म्हात्रे, .सदाशिव वसंतशेठ पाटील व परिसरातील मान्यवरांनी त्यांच्या पार्थिवाचे दर्शन घेतले.

# वाल, रोठा सुपारीच्या जीआय मानांकनासाठी भरीव प्रयत्न करणार : मंत्री आदिती तटकरे

**रोहे : प्रतिनिधी**

शेतकऱ्यांनी २५ ते ५० टक्के रासायनिक खताचा वापर कमी करून सेंद्रिय खतांकडे वळण्याची आवश्यकता आहे. शेतकऱ्यांनी शक्यतो सेंद्रिय शेती कडे वळण्याची आवश्यकता आहे. यंदाच्या वर्षी महिला शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी शासनाच्यावतीने पुढाकार घेण्यात येणार आहे. कृषी विभाग व फलोत्पादन कडुन रोपटे उपलब्ध करुन देत असतात. ती रोपे छोटी नको. मोठी रोपटे शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात यावे. शक्यतो ती फळझाडे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना कृषी विभागाने सातत्याने हवामान खात्याकडून येणाऱ्या सूचनेचा वेळोवेळी माहिती पुरविल्यास त्यांना त्यांचं नियोजन करणे चांगले होईल. शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा. जिल्ह्यातील सफेद कांद्याला जीआय मानांकन मिळाले आहे आता वाल व रोठा सुपारी साठी जिआय मानंकन साठी प्रयत्न करणार असल्याचे महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.





पंचायत समिती रोहा व तालुका कृषी अधिकारी कार्यालय यांचे संयुक्त विद्यमाने रोहा पंचायत समिती येथे आयोजित तालुकास्तरीय कृषी मेळाव्यात मार्गदर्शन करताना बोलत महीला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे बोलत होत्या.ना.आदिती तटकरे यांच्या हस्ते प्रयोगशील शेतकऱ्यांचे सन्मान करण्यात आले.

यावेळी जिल्हा परिषद उपाध्यक्ष मधुकर पाटील, कृषी व पशुसंवर्धन सभापती वैकुंठ पाटील, पंचायत समिती सभापती विजया पाशिलकर, उपसभापती संजय मांडलुस्कर, जिप सदस्य उर्वशी वाडकर, निधी जाधव, सुमीत काते, पंचायत समिती सदस्य किसनराव मोरे, जगन्नाथ धनावडे, वर्षा देशमुख, समृध्दी कोळी, करुणा हंबीर, गटविकास अधिकारी महादेव शिंदे, माजी सभापती सदानंद गायकर, बाबुराव बामणे, कृषी अधिकारी महादेव करे, पंचायत समिती कृषी अधिकारी रणजीत लवाटे, बाबुराव बामणे, विनोद पाशिलकर, अमित घाग, दिलीप पाबरेकर आदी उपस्थित होते.

यावेळी वैकुंठ पाटील यांनी कृषी व पशुसंवर्धन सभापती पद मिळाल्याने शेतकऱ्यांची सेवा करण्याची संधी मला मिळाली आहे. या विभागाच्या योजना तळागाळापर्यंत माझे कर्तव्य आहे. शेतकऱ्यांच्या अडचणी व त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी मी सातत्याने त्यांच्या पाठीशी उभे राहणार आहे. तालुक्यात शासनाच्या विविध लाभाच्या योजना जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे.राज्य व केंद्र सरकारच्या योजना शेतकऱ्यांना पोहचवण्यासाठी मी कटिबद्ध असल्याचे पाटील यांनी सांगितले.

प्रगतशील तालुक्याच्या शेतकऱ्यांचे सन्मान करुन प्रोत्साहन देणे हा मुख्य उद्देश शेतकरी मेळाव्याचे असल्याचे सांगत वेगवेगळ्या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयेश भोईर यांनी केले.यावेळी मोठ्या संख्येने शेतकरी, सरपंच,पंचायत समिती अधिकारी कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# बेफाम डंपरचा थरार; चौकर पाखाडीत वीज खांब उद्ध्वस्त

## श्रीवर्धन पाच तास अंधाराच्या विळख्यात!

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन शहरात अवजड डंपरच्या बेफाम धावपळीने पुन्हा एकदा धोक्याची घंटा वाजवली आहे. चौकर पाखाडी येथे सायंकाळी सुमारे सहाच्या सुमारास घडलेल्या भीषण अपघातात एका भरधाव डंपरने थेट वीज खांबाला धडक देत तो जागीच कोसळवला. परिणामी संपूर्ण परिसर पाच तास अंधारात बुडाला आणि नागरिकांना प्रचंड गैरसोयीला सामोरे जावे लागले.



मुळगाव कोळीवाडा परिसरात सुरू असलेल्या ग्रोयान्स बंधाऱ्याच्या कामासाठी फॉरकॉन कंपनीमार्फत मोठ्या प्रमाणात दगड वाहतूक सुरू आहे. गालसुरे येथील दगड खाणीतून दगड घेऊन जाणारा दहा चाकी डंपर (एमएच १५ जेसी ६६९४) चौकर पाखाडीच्या अरुंद रस्त्यावरून जात असताना चालकाचे नियंत्रण सुटले आणि डंपर थेट वीज खांबावर आदळला. धडक इतकी जबरदस्त होती की वीज खांब अक्षरशः उडून पडला आणि मुख्य वीजवाहिनी तुटल्याने शहरातील वीजपुरवठा ठप्प झाला.

या अचानक झालेल्या वीज खंडिततेमुळे उकाड्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांचे हाल झाले. घरगुती कामे ठप्प झाली, पाण्याचा पुरवठा विस्कळीत झाला, तर व्यापाऱ्यांचेही मोठे नुकसान झाल्याचे समोर आले. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्ण यांना त्रास सहन करावा लागला.

धक्कादायक बाब म्हणजे, गेल्या काही महिन्यांपासून याच कंपनीच्या डंपरकडून शहरातील विविध ठिकाणी वीज खांबांना धडक देण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. यामध्ये वीज खांब, तारा, इन्सुलेटर आणि डीपी स्ट्रक्चरचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, संबंधित यंत्रणांकडून ठोस कारवाई होत नसल्याची नागरिकांची भावना आहे.

नागरिकांनी प्रशासनाकडे तात्काळ कठोर उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. अवजड वाहनांसाठी वेगळे मार्ग निश्चित करणे, वेगमर्यादा लागू करणे आणि नियमभंग करणाऱ्यांवर कडक कारवाई करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

दरम्यान, या घटनेनंतर वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी युद्धपातळीवर काम करत रात्री उशिरापर्यंत प्रयत्न केले आणि अखेर पाच तासांनंतर वीजपुरवठा पूर्ववत करण्यात आला.

# यंदाच्या पावसाळ्यात रायगड जिल्ह्यात २० लाख बांबू रोपांची होणार लागवड

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात येत्या पावसाळ्यात तब्बल २० लाख बांबू रोपांची लागवड करण्यात येणार आहे. दरडग्रस्त आणि मातीची धूप होत असलेल्या भागात प्राधान्य बांबूची लागवड करण्यात येणार आहे.

रायगडमध्ये गेल्या काही वर्षांत अतिवृष्टीमुळे डोंगर उतारांवरील माती वाहून जाण्याचे प्रमाण वाढले आहे. अनेक गावांमध्ये दरडी कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत. या पार्श्वभूमीवर माती घट्ट धरून ठेवणारा आणि कमी कालावधीत वाढणारा बांबू हा प्रभावी पर्याय मानला जात आहे. त्यामुळे वनविभाग, सामाजिक वनीकरण विभाग आणि कृषी विभागाच्या माध्यमातून संयुक्तपणे मोठ्या प्रमाणावर बांबू लागवड मोहिम राबवली जात आहे.

सध्या जिल्ह्यातील विविध रोपवाटिकांमध्ये ४९ हजार २६९ बांबू रोपे तयार झाली असून उर्वरित रोपांची निर्मिती प्रक्रिया सुरू आहे. वनविभाग रोहा यांच्या ५, वनविभाग अलिबाग यांच्या १५, सामाजिक वनीकरण विभागाच्या १४ आणि कृषी विभागाच्या ७ अशा एकूण ४१ रोपवाटिकांमध्ये रोप निर्मितीचे काम सुरू आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत वेश्वी येथील शासकीय रोपवाटिकेत बांबू रोप निर्मितीचा विशेष प्रयोग सुरू करण्यात आला आहे. या माध्यमातून महिला बचत गट, स्वयं सहायता गट आणि शेतकऱ्यांना रोजगारासोबत पर्यावरण संवर्धनाची संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून केला जात आहे.

नुकत्याच झालेल्या खरीप हंगाम नियोजन बैठकीत फलोद्यान मंत्री भरत गोगावले यांनी बांबू लागवडीचा आढावा घेतला, जिल्ह्यासाठी बांबू लागवड लाभदायी ठरत असून कृषी अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना पडीक जागेत बांबू लागवडीसाठी प्रोत्साहित करण्याच्या सूचना दिल्या.

# अंधारात ढकलले श्रीवर्धन! वारंवार वीज खंडित; महावितरणच्या निष्काळजी कारभारावर नागरिकांचा संताप

**श्रीवर्धन : : प्रतिनिधी**

श्रीवर्धन शहर व परिसरात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या वीज खंडितमुळे नागरिक अक्षरशः हैराण झाले असून, महावितरणच्या कारभारावर तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

उकाड्याच्या कडाक्यात अचानक वीजपुरवठा खंडित होत असल्याने दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. घरगुती कामे, पिण्याच्या पाण्याची सोय, व्यापारी व्यवहार आणि विद्यार्थ्यांचा अभ्यास या सर्वांवर त्याचा गंभीर परिणाम होत आहे.

महावितरणकडून दर मंगळवारी देखभाल व दुरुस्तीच्या नावाखाली नियोजित वीज बंद ठेवली जाते. मात्र, त्यानंतरही इतर दिवशी तसेच रात्रीच्या वेळी वारंवार होणाऱ्या अनियमित वीज खंडितमुळे नागरिकांच्या संयमाचा बांध फुटला आहे. "दर मंगळवारी नेमकी कोणती कामे केली जातात, जर रोजच वीज जाते, असा रोखठोक सवाल नागरिक विचारत आहेत.

यंदा पर्यटन हंगाम जोरात सुरू असून श्रीवर्धन, हरिहरेश्वर आणि दिवेआगर या किनारी भागात मोठ्या प्रमाणावर पर्यटकांची वर्दळ आहे. मात्र, वारंवार होणाऱ्या वीज खंडितमुळे हॉटेल, लॉज, होमस्टे तसेच स्थानिक व्यावसायिकांचे मोठे नुकसान होत आहे. पर्यटकांनाही असुविधा सहन करावी लागत असल्याने पर्यटन व्यवसायाच्या प्रतिमेलाही धक्का बसत असल्याची भीती व्यक्त होत आहे.


अचानक वीज खंडित झाल्यामुळे फ्रीज, टीव्ही, संगणक यांसारख्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांचे नुकसान होण्याचा धोका वाढला आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांना उकाड्यात मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे, ही बाब अधिक चिंताजनक आहे.

ऊर्जा पुरवठा हा मूलभूत नागरी हक्क मानला जात असताना, वारंवार होणारे तांत्रिक बिघाड आणि त्यावरील विलंबित प्रतिसाद यामुळे महावितरणच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरम्यान, प्रशासनाने या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन ठोस उपाययोजना केल्या नाहीत, तर नागरिकांचा संताप तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

# सुधागडमध्ये वीज गुल झाल्याने अनोखी 'पाणीबाणी'

**कर्जत : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यामध्ये झालेल्या वादळी अवकाळी पावसामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. पावसाचा जोर आणि वेगवान वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी विजेचे खांब कोसळल्याने संपूर्ण तालुक्यात अंधाराचे साम्राज्य पसरले होते. १२ तासांहून अधिक काळ वीजपुरवठा खंडित राहिल्याचा थेट परिणाम आता पिण्याच्या पाण्यावर झाला असून, पाली शहरासह परिसरात बाटलीबंद पाण्याचा मोठा तुटवडा निर्माण झाला आहे.





दरम्यान, पाली शहराला थेट आंबा नदीतून पाणीपुरवठा केला जातो. मात्र, हे पाणी कोणत्याही तांत्रिक प्रक्रियेविना किंवा शुद्धीकरणाशिवाय थेट नळाद्वारे पुरवले जात असल्याने नागरिक आरोग्याच्या कारणास्तव बाटलीबंद (जार) पाण्याला पसंती देतात. मात्र, वीज नसल्यामुळे तसेच वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्याने पाणी शुद्धीकरण प्रकल्प (RO Plants) बंद पडले आहेत. परिणामी, बाजारात बाटलीबंद पाण्याचा साठा संपला असून नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे.

वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने पाणी उपसा आणि शुद्धीकरण यंत्रणा कोलमडली आहे. मागणी असूनही साठा उपलब्ध नसल्याने पाणी विक्रेते आणि दुकानदार हतबल झाले आहेत.

सध्या पावसाने विश्रांती घेतली असली तरी, वीज यंत्रणा पूर्वपदावर येण्यास विलंब लागत असल्याने ही 'पाणीबाणी' आणखी काही काळ राहण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. दरम्यान, मागील दोन-तीन दिवसांपासून बाटलीबंद पाणी मिळत नाही.

# कॅ.विठ्ठलराव कदम यांना सैनिक रत्न पुरस्कार

**चौक : प्रातिनिधी**

कॅप्टन विठ्ठलराव नारायणराव कदम यांना सैनिक फेडरेशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने सैनिक रत्न पुरस्कार जाहीर झाल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

कॅप्टन विठ्ठलराव नारायणराव कदम हे भारतीय लष्करात ९ जानेवारी १९५७ साली भरती झाले,३२ वर्ष सेवा करून १ ऑक्टोंबर १९८८ रोजी सेवा निवृत्त झाले. निवृत्त होईपर्यंत त्यांनी युद्ध मोहिमांमध्ये शौर्याने सहभाग नोंदविला आहे.गोवा मुक्ती संग्राम १९६०,चीनचे आक्रमण १९६२,पाकिस्तानचे आक्रमण १९६५,भारत-पाकिस्तान युद्ध १९७१ (पश्चिम भाग) त्यातून बांगला देशाची निर्मिती झाली , भारत-पाकिस्तान युद्ध १९७१ (पूर्व भाग) ब्ल्यू स्टार ऑपरेशन १९८४.या सेवकाळात त्यांना सैन्य सेवा मेडल, समर सेवा मेडल १९६५, पूर्वी स्टार मेडल,पश्चिमी स्टार मेडल,फील्ड एरिया मेडल, नाइन इयर लाँग सर्विस मेडल,



२५ वी आझादी मेडल,संग्राम मेडल,३० वर्ष सेवा मेडल. प्राप्त झाले असून अनेक सामाजिक संघटना, ग्राम पंचायत वावंढळ यांच्या वतीने शौर्य पूरस्कार,कोयना क्षत्रिय मराठा समाज यांच्या वतीने जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्माननित करण्यात आले आहे.सेवा निवृत्तीनंतरही त्यांनी समाजसेवेचा वसा कायम ठेवला. तंटा मुक्ती अभियानाचे अध्यक्ष म्हणून गावातील सामाजिक सलोखा जपण्यासाठी मोलाचे योगदान दिले. माजी सैनिक व वीरमाता, विधवा पत्नी यांना शासनाच्या विविध योजना व पेन्शन मिळवून देण्यासाठी शासनाकडे सातत्याने पत्रव्यवहार करून अनेक कुटुंबांना न्याय मिळवून देण्याचे कार्य त्यांनी केले आहे.

# पै. खाँसाहेब आबीद हुसैन स्मृती संगीत समारोह

**मुरूड** : पै. खाँसाहेब आबीद हुसैन व कै. वामनराव (अण्णा) भावे यांच्या स्मरणार्थ रविवार १७ मे रोजी दुपारी ४ वाजता भव्य संगीत समारोहाचे आयोजन मुरुड येथील वसंतराव नाईक महाविद्यालयाचे सभागृहात करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमात अजय राऊत (नांदगाव) व पंडीत अजय चक्रवर्ती यांच्या शिष्या अन्वेषा हलदार (मुंबई) यांचे सुरेल गायन तसेच सुप्रसिद्ध संवादिनी वादक अनंत जोशी यांचे एकल संवादिनी वादन तर चिन्मय लेले एकल तबला वादन होणार असून तबला साथ अभय दातार यांची लाभणार आहे. या कार्यक्रमात यंदाचा गिरिजा कीर संगीतप्रेमी पुरस्कार अजय राऊत (नांदगाव) यांना प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती अध्यक्ष मिलिंद गोखले (पनवेल ) व कार्यवाह डॉ. रवींद्र नामजोशी मुरुड-जंजिरा यांनी दिली आहे. तरी संगीत रसिकांनी या कार्यक्रमास आवर्जुन उपस्थित राहून यथाशक्ती मदत करावी.

# माणगाव येथे आमदार प्रवीण दरेकर यांनी घेतली जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष पंकज तांबेंची सदिच्छा भेट



**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र गृहनिर्माण स्वयं समुह पुनर्विकास प्राधिकरण अध्यक्ष ना.प्रविण दरेकर यांनी रायगड जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष तथा शेतकऱ्यांचे नेते पंकज रवींद्र तांबे व परिवाराची पंकज तांबे यांच्या खांदाड - माणगाव येथील विभारज कॉटेज निवासस्थानी कौटुंबिक सदिच्छा भेट घेतली.

आमदार प्रवीण दरेकर हे शुक्रवार दि.१५ मे रोजी रायगड जिल्ह्यात एका कार्यक्रमाच्या निमित्ताने आले होते. या दिवशी सकाळी ११ वा.दरेकर यांनी रायगड जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष तथा शेतकऱ्यांचे नेते पंकज रवींद्र तांबे व परिवाराची पंकज तांबे यांच्या खांदाड - माणगाव येथील विभारज कॉटेज निवासस्थानी कौटुंबिक सदिच्छा भेट घेतली.

यावेळी पंकज तांबे आणि परिवाराकडून ना.दरेकर यांचे पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन जोरदार स्वागत करण्यात आले. यावेळी भाजप नेते बिपीन म्हामुणकर,बापू सोनगिरे,राजिपचे माजी शिक्षण व आरोग्य समिती सभापती ज्ञानदेव पवार,जिल्हा राष्ट्रवादीचे उपाध्यक्ष रवींद्र मोरे,उद्योगपती सीताराम उभारे,स्वप्नील शिर्के,सुनील अर्बन,मुकुंद वाढवळ,देवेंद्र राऊत,सिद्धार्थ गायकवाड,समीर म्हामुणकर,दिपक नाडकर,प्रकाश कदम,विजय नलावडे,गणेश नलावडे,तांबे परिवार,पंकज तांबे मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**माणगाव : येथील ज्येष्ठ पत्रकार सलीम शेख यांना जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, केंद्रप्रमुख शंकर शिंदे, युवानेते राजेंद्र शिर्के, कुणबी समाज साले ग्रुपचे अध्यक्ष सुभाष गुगळे, उपसरपंच प्रसाद देवळेकर व सहकाऱ्यांनी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.**

# मुंबईचा पंजाबवर रोमांचक विजय!

## पंजाबच्या प्लेऑफच्या आशांना धक्का



**धरमशाला : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६ मधील ५८ व्या सामन्यात मुंबई इंडियन्स आणि पंजाब किंग्ज यांच्या लढतीत मुंबई इंडियन्सने पंजाब किंग्सचा त्यांच्या घरच्या मैदानावर ६ विकेट्सने पराभव केला. हा पंजाब किंग्सचा स्पर्धेतील सलग पाचवा पराभव ठरला. या पराभवासह संघाच्या प्लेऑफच्या आशांना मोठा धक्का बसला आहे. आता पंजाबसाठी प्लेऑफ गाठणं ५० टक्क्यांपेक्षा कमीच्या शक्यतेवर आले आहे. मुंबईला १८ चेंडूंत ५० धावांची गरज असताना मार्को यान्सनच्या षटकात तिलक व विल जॅक्सने २२ धावा कुटल्या. यासह मुंबईला विजयाच्या उंबरठ्यावर नेलं.

यानंतर अर्शदीप सिंगने १९व्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर षटकार आणि नंतर चौकार मारत सामना अधिक क्लोज आणला. यासह मुंबईला विजयासाठी १५ धावांची गरज होती. झेवियर बार्टलेट अखेरचं षटक टाकण्यासाठी आला होता. जॅक्सने पहिल्याच चेंडूवर षटकार खेचला आणि आता मुंबईला जिंकण्यासाठी ९ धावांची गरज होती. त्यानंतर दुसऱ्या चेंडूवर एक धाव आणि तिसरा चेंडू निर्धाव राहिला. मग चौथ्या व पाचव्या चेंडूवर तिलकने दोन षटकार खेचत मुंबईला सामना जिंकून दिला. पंजाब किंग्सने दिलेल्या २०१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना चांगली सुरूवात केली. रोहित शर्माने सावध फलंदाजी केली, तर एका टोकाकडून रायन रिकल्टने आक्रमक फटके खेळले. रायन रिकल्टन २३ चेंडूत ४ चौकार व ४ षटकारांसह ४८ धावा करत बाद झाला. तर रोहित दोन षटकारांसह २५ धावा करत माघारी परतला. नमन धीर ९ धावा करत स्वस्तात परतला. शेरफन रूदरफोर्ड व तिलक वर्मा यांनी ४२ चेंडूत ६१ धावांची भागीदारी रचली. रूदरफोर्ड २० धावा करत बाद झाला. त्यानंतर मैदानावर आलेल्या विल जॅक्सने तिलकच्या जोडीने संघाला विजयापर्यंत नेलं.

तिलक वर्मा व विल जॅक्स यांनी २० चेंडूत ५६ धावांची भागीदारी रचली. तिलकने या सामन्यात ३३ चेंडूत ६ चौकार व ६ षटकारांच्या मदतीने नाबाद ७५ धावांची मॅचविनिंग खेळी केली. तर विल जॅक्सने १० चेंडूत २ चौकार व २ षटकारांच्या मदतीने २५ धावा केल्या. या दोघांच्या अखेरच्या षटकांतील खेळीमुळे मुंबईने सामना जिंकला. मुंबई स्वत: प्लेऑफमधून बाहेर झाली असली तरी या विजयाचा फटका मात्र पंजाब किंग्सला चांगलाच बसला आहे.

सर्वप्रथम मुंबई इंडियन्सने सामन्याची नाणेफेक जिंकत पंजाब किंग्सला फलंदाजीसाठी पाचारण केलं. प्रियांश आर्य आणि प्रभसिमरन सिंग यांनी अर्धशतकी भागीदारी करीत संघाला चांगली सुरूवात करून दिली होती. प्रभसिमरन सिंगने ३२ चेंडूंत ५७ धावांची उत्तम खेळी केली, तर प्रियांश आर्यने २२ धावा, तर कुपर कॉनोलीने २१ धावांचे योगदान दिले.

# जीएस मेडिकलचा दणदणीत विजय

## प्रो. ए. एस. छगला करंडकावर कोरले नाव



**मुंबई : प्रतिनिधी**

प्रोफेसर ए. एस. छगला इंटर मेडिकल क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात जी. एस. मेडिकल कॉलेज-केईएम हॉस्पिटल संघाने शानदार कामगिरी करीत डी. वाय. पाटील डेंटल कॉलेजचा ५ विकेटने पराभव करून विजेतेपद पटकाविले. बॉम्बे जिमखाना मैदानावर रंगलेल्या या थरारक सामन्यात अभिजीत राठोड (७० धावा) आणि दिपेश कुमार (४२ धावा) यांच्या दुसऱ्या विकेटसाठी १०३ धावांच्या भागीदारीमुळे जीएस मेडिकलचा विजय सुकर झाला. बॉम्बे जिमखाना येथे झालेल्या अंतिम सामन्यात डी. वाय. पाटील डेंटल कॉलेजने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारली. मात्र जीएस मेडिकलच्या गोलंदाजांनी सुरुवातीपासून अचूक मारा करत प्रतिस्पर्धी फलंदाजांवर दबाव निर्माण केला. फिरकीपटू श्रीराम फुलझालके यांनी अवघ्या ६ धावांत ३ बळी घेत प्रभावी कामगिरी केली, तर निखिल नावडकर यांनी ३१ धावांत ३ आणि आदित्य बभाले यांनी २ बळी घेतले. त्यामुळे डी. वाय. पाटील डेंटल कॉलेजचा डाव ३०.४ षटकांत १६५ धावांवर आटोपला.

डी. वाय. पाटीलकडून आरव अडवाणीने ३१ चेंडूत ३७ धावांची खेळी केली. गौरव शेंडेने २५, तर प्रणव कुमारने २३ धावांचे योगदान दिले. मात्र इतर फलंदाजांना मोठी खेळी करता आली नाही. १६६ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना जीएस मेडिकलची सुरुवात सावध झाली. त्यानंतर सलामीवीर अभिजीत राठोड आणि दिपेश कुमार यांनी दुसऱ्या विकेटसाठी १०३ धावांची भक्कम भागीदारी करत सामन्यावर पकड मजबूत केली.

# रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे उदयोन्मुख मुलांसाठी 'टॅलेंट हंट' कार्यक्रम

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने २३ व २४ मे रोजी पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगणावर १४ वर्षांखालील उदयोन्मुख मुलांसाठी टॅलेंट हंट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.


रायगड जिल्ह्यातील सर्व अकॅडमी, क्लबपासून अगदी गल्लीतले फलंदाज व गोलंदाज ते स्टेडियमचा स्टार असा प्रवास करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या रायगड जिल्ह्यातील सर्व युवा क्रिकेटपटूंसाठी एक मोठी संधी उपलब्ध झाली आहे. रायगड जिल्ह्यातील १४ वर्षाखालील ०१/०९/२०१२ वर्षानंतर जन्मलेल्या वयोगटातील मुलांसाठी एका विशेष क्रिकेट टॅलेंट हंट कार्यक्रमाचे आयोजन प्रथमच रायगड जिल्ह्यातील युवा खेळाडूंसाठी आरडीसीएतर्फे करण्यात आले आहे. टॅलेंट हंट कार्यक्रमामध्ये जलदगती गोलंदाज, तंत्रशुद्ध फलंदाज याचे शास्त्रोक्त मूल्यमापन करून घेता येईल. गोलंदाजीसोबतच फलंदाजीतील कसब दाखवण्यासाठीही खेळाडूंना व्यासपीठ मिळणार आहे. या निवड प्रक्रियेमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची निवड रायगडच्या संभाव्य संघात केली जाणार असून निवड झालेल्या खेळाडूंना रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनमार्फत तज्ज्ञ प्रशिक्षकांकडून प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

### दिग्गज खेळाडूंची उपस्थिती आणि निवड समिती

या कार्यक्रमाला महाराष्ट्र क्रिकेट संघातील स्टार खेळाडू व प्रशिक्षक मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या उपस्थितीमुळे तरुण खेळाडूंना मोठे प्रोत्साहन मिळणार आहे. तसेच ते खेळाडूंची निवड आणि मार्गदर्शन करणार असून अनुभवी प्रशिक्षकांसमोर आपली कला सादर करण्याची ही खेळाडूंना दुर्मीळ संधी असेल. रायगड जिल्ह्यातील १४ वर्षाखालील जास्तीत जास्त मुलांनी टॅलेंट हंट कार्यक्रमामध्ये सहभाग घेण्यासाठी जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन आपली नोंदणी दिनांक २१ मेपर्यंत ऑनलाइन पद्धतीने करायची आहे. टॅलेंट हंट कार्यक्रमासंबंधी अधिक माहितीसाठी सहसचिव जयंत नाईक ९५६१०९९७३५, अरुण शिंदे ९५२७६०८०८०, देवेंद्र पाटील ९२२६९५११७६ यांच्याशी संपर्क साधावा. रायगड जिल्ह्यातील युवा खेळाडूंनी टॅलेंट हंटमध्ये आपली नोंदणी करण्याचे आवाहन रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक यांच्या वतीने करण्यात आले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा २०२६

# मुंबई, पुणे, लातूरची विजयी घोडदौड



**बदलापूर : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत यजमान मुंबईसह कोल्हापूर, लातूरच्या संघांनी अपेक्षेप्रमाणे विजयी सलामी दिली आणि चिवट झुंज देत विजय खेचून आणले. पुण्याच्या मुलींच्या दोन्ही संघांनी चमकदार कामगिरीचे प्रदर्शन घडवत दिवस गाजवला.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशन व कुळगाव-बदलापूर नगरपरिषद यांच्या संयुत विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा बदलापूर जिमखाना मैदानावर रंगली आहे. कडक उन्हामुळे संध्याकाळी विघुतप्रकाश झोतात रंगलेल्या या स्पर्धेचा पहिला दिवस पुणे संघाने गाजविला. पुणे संघाच्या मुलींच्या दोन्ही संघाने विजयश्री प्राप्त केली. १८ वर्षांखालील मुलांच्या गटातील अटीतटीच्या लढतीत पुणे संघाने नाशिकचा २५-२०, २५-२१ गुणांनी पराभव करून गटात अव्वल स्थानावर झेप घेतली आहे.


साखळी पध्दतीने १८ व २१ वर्षांच्या मुला-मुलींच्या स्पर्धेत दोन गटात स्पर्धा सुरू रंगली आहे. २१ वर्षांखालील मुलांच्या गटात मुंबईने नाशिकला २५/१०, २५/१२ गुणांनी नमवले. सामन्यात मुंबईने सुरूवातीपासून आपली पकड कायम राखत विजयी वाटचाल सुरू केली. या गटातील दुसऱ्या साखळी लढतीत लातूरने कोल्हापूरवर २५/१५, २५/१० गुणांनी मात करीत विजयाचा झेंडा रोवला. १८ वर्षांखालील मुलींच्या गटातही लातूरने नाशिकचा २५/६, २५/११ गुणांनी धुव्वा उडवत मैदान गाजवले.

मुलांच्या १८ वर्षांखालील गटातील पुणे विरूध्द नाशिक लढत शेवटच्या मिनिटापर्यंत चुरशीची झाली. सुरूवातीपासून पुणे संघाने आघाडी घेतली. पुण्याचा कर्णधार अनुज जोशीने मध्यरेषेवरून खेळताना जोरदार स्मॅशेस मारून गुणांची खाते उघडले. पाठोपाठ ओम झगडेने जोरदार प्रतिकार करीत तर स्वानंद राजोपाध्यने सुरेख पास करीत सामन्यावर वर्चस्व कायम राखले.

दरम्यान, पुणे संघाच्या मुलींनी १८ आणि २१ वर्षांखालील दोन्ही गटांतील लढती जिंकून आपली विजयाची दावेदारी दाखवली. २१ वर्षांखालील गटात पुणे संघाने लातूरवर २५/११, २५/१६ गुणांनी सहज मात केली आहे. १८ वर्षांखालील गटात पुणे संघाने संभाजीनगरवर २५/८, २५/१० गुणांनी एकतर्फी असा विजय संपादन केला.

### खेळाडूंसाठी रिसॉर्टमध्ये निवासव्यवस्था

शासकीय स्पर्धेच्या इतिहासात प्रथमच सर्व खेळाडूंची निवासव्यवस्था ही चक्क रिसार्टमध्ये करण्यात आली आहे. बदलापूरमधील सर्वच रिसोर्ट व्हॉलीबॉल स्पर्धेमुळे बुक झाले आहेत. प्रथमच उत्तम दर्जाच्या निवासव्यवस्थेमुळे खेळाडू बदलापूरच्या पाहुणचाराचे कौतुक करीत आहेत. क्रीडा व युवक सेवा संचालनालय व कुळगाव-बदलापूर नगरपरिषद हे एकत्रितपणे हा रिसार्टसाठी खर्च करणार असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनंतर आरामदायी निवासव्यवस्था उपलब्ध करण्यात आली आहे.






# राजस्थान रॉयल्सच्या जर्सीचे नाशिकशी खास कनेक्शन

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२६ मध्ये राजस्थान रॉयल्सच्या खेळाडूंनी परिधान केलेली 'पिंक प्रॉमिस' जर्सी एका नाशिककर तरुणीने डिझाईन केली आहे. १९ वर्षीय समीक्षा मुंदडाच्या या डिझाईनची निवड ८५०० प्रवेशिकांमधून करण्यात आली. त्यामुळे राजस्थान रॉयल्सच्या जर्सीचे नाशिकशी खास कनेक्शन दिसून येत आहे.

इंडियन प्रीमिअर लीग २०२६ चा हंगाम आता शेवटाकडे सरकू लागला आहे. प्लेऑफमधील अंतिम चार संघ कोणते असतील हे अजूनही निश्चित झालेले नाही. हा आयपीएलचा हंगाम नाशिककरांसाठी विशेष ठरला आहे. कारण या हंगामात नाशिकच्या दोन खेळाडूंनी आयपीएलमध्ये प्रत्यक्ष सहभाग घेतला आहे.

# अंपायरला शिवीगाळ करणे भोवले!

## पोलार्डवर बीसीसीआयकडून कारवाई

**धरमशाला : वृत्तसंस्था**

मुंबई इंडियन्सचा दिग्गज कायरन पोलार्ड आयपीएलच्या आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी दोषी आढळला आहे. पंजाब किंग्सविरुद्धच्या सामन्यात चौथ्या पंचांविरुद्ध अश्लील भाषेचा वापर केल्याने बीसीसीआयने त्याच्यावर कडक कारवाई केली आहे. पोलार्डने आपली चूक मान्य केली असून या वादामुळे क्रिकेट वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

धरमशालेच्या मैदानावर झालेल्या सामन्यात पंजाब किंग्स आणि मुंबई इंडियन्स हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना पंजाब किंग्सने २०० धावांचा डोंगर उभारला होता. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या मुंबई इंडियन्सकडून तिलक वर्माने दमदार अर्धशतकी खेळी केली. या खेळीच्या बळावर मुंबई इंडियन्सने हा सामना ६ गडी राखून आपल्या नावावर केला. सामना जिंकल्यानंतर बीसीसीआयकडून मुंबई इंडियन्सचा प्रशिक्षक कायरन पोलार्डवर कारवाई करण्यात आली आहे.

# अर्शदीप सिंगची तिलक वर्मावर वर्णभेदी टीका

**मुंबई : प्रतिनिधी**

धरमशालेत पंजाब किंग्स आणि मुंबई इंडियन्स सामन्यापूर्वी अर्शदीप सिंगने इंस्टाग्रामवर शेअर केलेल्या एका व्हिडिओत तिलक वर्माला 'ओये अंधेरे' म्हटल्याने नवा वाद पेटला आहे. या वर्णभेदी टीकेनंतर नेटकऱ्यांनी अर्शदीपवर कठोर कारवाईची मागणी केली आहे. दरम्यान, या सामन्यात तिलकने नाबाद ७५ धावा करीत मुंबईला ६ गडी राखून मोठा विजय मिळवून दिला.

भारतीय संघातील डावखुऱ्या हाताचा वेगवान गोलंदाज आणि सध्या पंजाब किंग्स संघाचा भाग असलेला अर्शदीप सिंग आपल्या मैदानावरील कामगिरीमुळे नव्हे, तर वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आला आहे. अर्शदीप सिंगचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. ज्यावरून त्याला ट्रोल केलं जात आहे. अर्शदीप सिंगने मुंबई इंडियन्सचा स्टार फलंदाज तिलक वर्मावर वर्णभेदी टीका केली आहे. त्याचा हा व्हिडिओ व्हायरल होताच नेटकऱ्यांनी आता कारवाईची मागणी केली आहे. अर्शदीप सिंग आणि तिलक वर्मा हे दोघेही खूप चांगले मित्र आहेत. दोघेही भारतीय संघाकडून एकत्र खेळतात, पण असं असूनही तिलक वर्मावर वर्णभेदी टीका करणं हे क्रिकेट चाहत्यांना मुळीच आवडलेलं नाही. चाहत्यांनी त्याच्यावर वर्णभेदी टीका करण्याचे आरोप केले आहेत.











दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com